वर्ष: 7 वे अंक: 10 वा

16 - 30 नोव्हेंबर, 2026 (विनामूल्य)

न्यू इंडिया समाचार



12 वा संविधान दिवस

विस्मृती ते उत्सवापर्यंत

26 नोव्हेंबरची जी तारीख कधीकाळी इतिहासात हरवली होती, ती आज जनतेचा उत्सव बनली आहे. 12 व्या संविधान दिनानिमित्त, 77 वर्षांचा हा प्रवास या गोष्टीचा साक्षीदार आहे की, आम्ही भारताचे लोक (वी द पीपल) हे आता केवळ प्रास्ताविकेतील शब्द राहिले नसून, ते न्याय, समानता आणि आत्मनिर्भरतेच्या रूपात 140 कोटी भारतीयांच्या जगण्यात प्रत्यक्ष साकार झालेला संकल्प बनले आहेत...

मन की बात
लोकशक्तीची उपासना



विजयादशमीच्या पवित्र प्रसंगी 12 वर्षांपूर्वी मन की बात या कार्यक्रमाला सुरुवात झाली होती, आणि तेव्हापासून हा प्रवास अविरत सुरू आहे. या प्रवासाचे सहप्रवासी आणि मार्गदर्शकही देशवासीच आहेत. मन की बात हा देशातील सामान्य माणसाचे परिश्रम, पराक्रम, वचनबद्धता, समर्पण आणि सेवाभावाचे गौरवगान करण्याची शुभ संधीच आहे. 25 ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, माझ्यासाठी मन की बात हा कार्यक्रम म्हणजे देशातील लोकांचे प्रयत्न जवळून जाणून घेण्याची आणि त्यांच्या योगदानाला वंदन करण्याची एक तीर्थयात्रा आहे...

- **अगणित प्रेरणादायी कथा:** 12 वर्षांत देशाच्या कानाकोपऱ्यातून असे अनेक लोक समोर आले आहेत, ज्यांच्या असाधारण कामांकडे समाजाचे सहसा लक्ष जात नाही. मन की बात या कार्यक्रमाने अशा अगणित प्रेरणादायी कथा आपल्या सर्वांसमोर आणण्याचे काम केले आहे.
- **लोकशक्तीची उपासना:** मी या कार्यक्रमाच्या माध्यमातून एक प्रकारे देशाच्या लोकशक्तीची उपासना करतो. मला या माध्यमातून देशातील प्रत्येक कुटुंबाशी जोडले जाण्याची संधी मिळते.
- **खेती विरासत मिशन:** पंजाबमध्ये बऱ्याच काळापासून एक प्रयत्न सुरू आहे. तिथे खेती विरासत मिशन नावाच्या एका संस्थेने सेंद्रिय शेती आणि पारंपरिक शेतीच्या पद्धतींना नवसंजीवनी देण्यास सुरुवात केली.
- **नवे जीवन:** निसर्गाचा आदर करणे ही आपल्याकडील पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे. उत्तराखंडमधील टिहरी गढवाल इथे लोकांनी एकत्र येऊन एका नदीला नवे जीवन देण्याचा प्रयत्न केला. या नदीचे नाव आहे हेवल (Havel), काही दिवसांपूर्वी या नदीचे पाणी कमी होऊ लागले होते आणि आसपासचे जलस्रोत आटत चालले होते. लोकांनी एकत्र येऊन पावसाचे पाणी अडवण्याच्या उपाययोजना केल्या, मोठ्या संख्येने रोपे लावली. आज नदीला जीवनदान मिळाले आहे. यासोबतच असंख्य नैसर्गिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन होण्यासही यामुळे मदत झाली आहे.
- **व्होकल फॉर लोकल:** सणासुदीच्या काळात सर्वांनी आपल्या आसपास एक बदल नक्कीच अनुभवला असेल. आता लोक खरेदी करताना स्वदेशी उत्पादनांना खूप महत्त्व देऊ लागले आहेत. व्होकल फॉर लोकलची हीच भावना आता आपली उत्पादने जगातील बाजारपेठांपर्यंत पोहोचवू लागली आहे.
- **खादी ग्रामोद्योग:** यंदा गांधी जयंतीनिमित्त केवळ एका दिवसात खादी ग्रामोद्योगाच्या उत्पादनांची विक्री 28 कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली. ही विक्री गेल्या वर्षीपेक्षाही दीड कोटी रुपयांनी जास्त आहे. म्हणजेच खादीची लोकप्रियता सातत्याने वाढते आहे.
- **देशवासीयांचा विश्वास:** 'ई-संजीवनी योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे 50 कोटी दूरस्थ वैद्यकीय सल्लामसलत (टेली-सल्लामसलत) केली गेली आहे. ही बाब तंत्रज्ञानाची ताकद, आपल्या डॉक्टरांचा सेवाभाव आणि देशवासीयांच्या विश्वासाचे उत्तम उदाहरण ठरली आहे.
- **आयुष्मान आरोग्य मंदिर:** आज देशभरात सुमारे 1 लाख 90 हजार आयुष्मान आरोग्य मंदिरांनी लोकांच्या जगण्यात नवनवीन सुविधा आणल्या आहेत. ही आरोग्य मंदिरे एक प्रकारे पंचायतींची आरोग्य केंद्रे म्हणून विकसित होऊ लागली आहेत.
- **असाधारण कार्य :** आपले युवा आज अशा विषयांवरही काम करत आहेत, जे संपूर्ण मानवजातीचे भविष्य बदलू शकतात. असेच एक क्षेत्र म्हणजे मेंदू वरील संशोधन. याच विषयाशी निगडित सुधा गोपाल कृष्णन ब्रेन सेंटर या सुविधेचे लोकार्पण मी आयआयटी मद्रास इथे केले होते. या केंद्राने मेंदूच्या प्रतिमा तयार करण्याचे एक तंत्रज्ञानाधारित व्यासपीठ विकसित केले आहे. अशा प्रकारचे हे जगातील पहिलेच अभियान आहे.
- **महर्षी वाल्मीकि :** हजारो वर्षांचा काळ लोटला, तरीही महर्षी वाल्मिकींचे रामायण आजही आपल्याला काहीतरी नवीन शिकवते. त्यांनी आपल्याला जीवनाची गहिरी शिकवण दिली आहे. ते आपल्याला सातत्याने प्रयत्न करत राहण्याचे तसेच सेवा, करुणा आणि सामाजिक समरसतेचे महत्त्व समजावून सांगतात.
- **अयोध्येत मंदिर :** अयोध्येत महर्षी वाल्मिकी, निषादराज आणि माता शबरी यांची मंदिरेही बांधण्यात आली आहेत. अयोध्येतील विमानतळाचे नावही महर्षी वाल्मिकी यांच्याच नावे ठेवण्यात आल्याचे मला समाधान आहे.

मन की बात पूर्ण ऐकण्यासाठी क्यूआर (QR) कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
समाचार

वर्ष 7 वे, अंक : 10 वा । 16–30 नोव्हेंबर 2026

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चन्दन कुमार चौधरी

भाषा संपादन
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
सत्यम सिंह
अनिल कुमार



13 भाषांमध्ये उपलब्ध असलेले 'न्यू इंडिया समाचार' पाक्षिक वाचण्यासाठी येथे क्लिक करा:
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

'न्यू इंडिया समाचार'चे जुने अंक वाचण्यासाठी येथे क्लिक करा:
https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

X वर सातत्याने येणाऱ्या 'न्यू इंडिया समाचार' मधील माहितीसाठी येथे भेट द्या @NISPIBIndia

आतील पानांवर...



जेव्हा 'वी द पीपल' बनले जनतेचा उत्सव

12 वा संविधान दिवस विशेष

मुखपृष्ठ कथा

देशाची लोकसंख्या जेमतेम 36 कोटी होती, संसाधने मर्यादित होती आणि आव्हाने अनंत होती... तरीही संविधान सभेने आपल्या अथक परिश्रमाने 26 नोव्हेंबर 1949 रोजी हा अजरामर दस्तऐवज राष्ट्राला सुपूर्द केला. कदाचित त्या वेळी कोणी विचारही केला नसेल की, ही ऐतिहासिक तारीख स्वतःच इतिहासाच्या पानांमध्ये कुठेतरी हरवून जाईल. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्ष 2015 मध्ये या विस्मरणात गेलेल्या तारखेचे पुनरुज्जीवन करून संविधान दिवस खऱ्या अर्थाने जनतेचा उत्सव बनवला... | 10-25

राष्ट्रीय एकता दिवस



सरदार पटेल यांच्या 151 व्या जयंतीदिनी पंतप्रधान मोदी म्हणाले की, राष्ट्राची एकता, अखंडता आणि सुरक्षेला बळकट करण्यात सरदार साहेबांची भूमिका ऐतिहासिक राहिली आहे. | 8-9

वृत्तसारांश | 4-5

व्यक्तिमत्त्व : जगदीशचंद्र बोस
ज्यांनी सिद्ध केले... वनस्पतींमध्येही असतो जीव | 6

भक्कम होत असलेली जागतिक भागीदारी
मुंबईत इंडिया केम 2026 च्या 14 व्या पर्वाचे आयोजन | 7

पीएम विकसित ग्राम स्वराज आणि कंटेनर निर्मिती संवर्धनाला मंजुरी
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले अनेक महत्त्वाचे निर्णय | 28-29

स्थैर्य... संधी... भविष्यासाठी आशेचा पाया
पीएम आवास ग्रामीण योजनेची 10 वर्षे | 30-31

सुरक्षा आणि प्रशासन : सुशासनातून समतोल विकास
आरबीआयचे डेटा सेंटर आणि सायबर सुरक्षा प्रशिक्षण संस्थेचे उद्घाटन | 32-33

भारताच्या सामर्थ्यामुळे वाढेल जगाचे सामर्थ्य
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एनडीटीवी जागतिक शिखर परिषद - 2026 ला केले संबोधित | 34-35

विकसित भारताचा पाया, वैज्ञानिक संशोधन आणि नवोन्मेष
पंतप्रधान मोदी यांनी विज्ञान नवोन्मेष परिषदेचे केले उद्घाटन | 36-37

2029 पर्यंत स्वच्छ होईल यमुना
दिल्लीत यमुना पुनरुज्जीवनाशी संबंधित प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन | 38-39

सौर ऊर्जेच्या जागतिक विस्ताराची किरणे
आंतरराष्ट्रीय सौर आघाडीची 11 वर्षे | 40-41

वायुदलाचे शौर्य प्रदर्शन
नमो घाटावर पंतप्रधान मोदी वायुदल दिन कार्यक्रमात झाले सहभागी | 42

वृत्तसारांश



पूर्णत्वाला जाईल 'राम ते राष्ट्र' आणि 'देव ते देश' ही संकल्पना

विजयादशमीनिमित्त पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आणि सांगितले की, अयोध्येतील प्राणप्रतिष्ठेच्या वेळी घेतलेला राम ते राष्ट्र आणि देव ते देश हा संकल्प आपण सर्वजण मिळून नक्की पूर्ण करू... |26-27

प्रकाशक: कंचन प्रसाद, महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो). **पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता:** खोली क्रमांक-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. **ईमेल:** response-nis@pib.gov.in आर.एन.आय क्रमांक: DELHIN/2020/78812

संपादकांच्या लेखणीतून...

आम्ही भारताचे लोक

संविधानाची ताकद, राष्ट्राची प्रेरणा

सप्रेम नमस्कार

26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान सभेने भारताच्या संविधानाचा स्वीकार केला होता. 26 जानेवारी 1950 रोजी ते लागू झाले. हा केवळ कायद्याचा ग्रंथ नसून सर्व भारतीयांच्या आकांक्षा, अधिकार आणि कर्तव्यांचा अमर जयघोष आहे. 2015 या वर्षापासून ही तारीख संविधान दिवस म्हणून साजरी केली जात आहे, आणि आता ती जनतेचा उत्सव बनली आहे. यंदा 26 नोव्हेंबर रोजी या दिनाचे 12 वे आयोजन होणार आहे. हे आयोजन आपल्याला स्मरण करून देते की, संविधानाची खरी ताकद शब्दांमध्ये नसून, त्याच्या लोकजीवनात उतरणाऱ्या भावनेमध्ये दडलेली आहे.

आपले संविधान आम्ही भारताचे लोक या शब्दांनी सुरू होते. आपणच त्याची ताकद आहोत, आपणच प्रेरणा आहोत आणि आपणच त्याचा उद्देशही आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी सोप्या शब्दांत याला भारतीयांसाठी प्रतिष्ठा आणि भारतासाठी एकता (डिग्निटी फॉर इंडियन अँड युनिटी फॉर इंडिया) असे म्हणतात. आपले संविधान आपल्याला अधिकारांप्रती सजग बनवते आणि कर्तव्यांप्रती जागरूकही करते.

गेल्या काही वर्षांत सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास हा मंत्र संविधानाच्या भावनेची सर्वात प्रभावी अभिव्यक्ती बनले असून, हीच अभिव्यक्ती सामाजिक न्याय, आर्थिक समावेशन आणि लोककल्याणाची नवी गाथा लिहीत आहे. जन धनपासून ते घरांपर्यंत आणि आयुष्मान भारतपासून ते किसान सन्मान निधीपर्यंत प्रत्येक उपक्रम समानता आणि सन्मानाचे मापदंड रचत आहे. कलम 370 निष्प्रभ करून संविधानाचे महत्त्व पुन्हा प्रस्थापित केले गेले. विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका परस्पर संतुलनासह भक्कम यंत्रणा म्हणून कार्यरत आहेत. भारतीय न्याय संहितेसह नवे कायदे न्यायव्यवस्थेला सोपी, आधुनिक आणि लोकाभिमुख बनवत आहेत.

लोकशाहीचे रक्षण सातत्यपूर्ण जागरूकतेमुळेच शक्य आहे. अधिकारांसह कर्तव्यांचे पालन करणे हीच संविधानाप्रती खरी निष्ठा आहे. आम्ही भारताचे लोक हे केवळ प्रास्ताविकेतील शब्द राहिले नसून राष्ट्रीय जीवनाचा संकल्प बनले आहेत. संविधानाचा आत्मा आत्मसात करून विकसित भारताच्या सुवर्णमयी वाटचालीत देशाचा प्रत्येक नागरिक सहभागी होत आहे. हाच विषय यंदाच्या आपल्या विशेष अंकाची मुखपृष्ठ कथा बनला आहे.

याशिवाय व्यक्तिमत्त्व या मालिकेत वनस्पतींमध्येही जीव असतो हे सिद्ध करणारे जगदीशचंद्र बोस, प्रमुख योजनांमध्ये पीएम आवास ग्रामीणची 10 वर्षे, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पंधरवडाभरातील कार्यक्रम यांचाही यात समावेश करण्यात आला आहे.

यासोबतच नियतकालिकाच्या आतील पानावर नभोवाणीवर प्रसारित होणारा मन की बात हा मासिक कार्यक्रम आणि मलपृष्ठावर 22 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) दिनानिमित्त विशेष मजकूरही समाविष्ट केला आहे.

आपण आपल्या सूचना आम्हाला पाठवत राहा.

(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले नियतकालिक वाचा / डाउनलोड करा:
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

तुमची मते...





सरकारचे नवे उपक्रम आणि चालू घडामोडींची माहिती मिळते

मी स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी, सरकारचे नवे उपक्रम, धोरणे, योजना आणि चालू घडामोडींबाबत अद्ययावत राहण्यासाठी नियमितपणे न्यू इंडिया समाचार हे नियतकालिक वाचतो. या उत्कृष्ट नियतकालिकाबद्दल संपूर्ण चमूचे आभार. मी या नियतकालिकाचे नवे आणि जुने अंक पाहण्यासाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट देतो.

प्रणव पट्टानी

papattani264@gmail.com

मला मिळते काही उपयुक्त माहिती

माझे नाव चिंतन आहे. मी नियमितपणे न्यू इंडिया समाचार वाचतो. मी संपूर्ण नियतकालिकावर एक नजर टाकतो. यात दिलेल्या माहितीमुळे मला माझ्या ज्ञानात भर घालण्यासाठी काही उपयुक्त गोष्टी मिळतात.

chintanr390@gmail.com

विकासाशी संबंधित माहिती जाणून घेता येते

न्यू इंडिया समाचार या केंद्र सरकारच्या अधिकृत नियतकालिकाच्या तेलुगू आवृत्तीचा मी नियमित वाचक आहे. मी सार्वजनिक धोरणाशी संबंधित माहितीला खूप महत्त्व देतो. मला विकसित भारताचे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेला विकासाचा आराखडा, राष्ट्रीय पातळीवरील कामगिरी आणि प्रशासनाशी संबंधित विचारांचा सखोल अभ्यास करायचा आहे. याच अनुषंगाने हे नियतकालिक खूप उपयुक्त ठरू लागले आहे.

जी. अशोक

cscashok1399@gmail.com

स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी न्यू इंडिया समाचार हे नियतकालिक अत्यंत उपयुक्त

मी न्यू इंडिया समाचारचा नियमित वाचक आहे. केंद्र सरकारच्या योजना, धोरणे आणि समकालीन घडामोडींच्या बाबतीत, स्वतःला अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने हे नियतकालिक अत्यंत उपयुक्त वाटते. या नियतकालिकामुळे देशाच्या प्रगतीबद्दलच्या माझ्या ज्ञानात भर पडते. एक जबाबदार नागरिक म्हणून अधिक जाणून घेण्यासाठी आणि सहभागी होण्यासाठी हे नियतकालिक मला प्रेरित करते.

निवेश गोयल

goyalnivesh98@gmail.com

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता : खोली क्रमांक - 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003.

ईमेल- response-nis@pib.gov.in

वृत्तसारांश

आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा 2026
भारताची सर्वोत्तम कामगिरी



जपानमधील आइची - नागोया इथे आयोजित आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा 2026 मध्ये भारताने आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. या स्पर्धेत भारताने 30 सुवर्ण, 35 रौप्य आणि 49 कांस्य पदकांसह एकूण 114 पदके जिंकली आणि पदकतालिकेत चौथे स्थान पटकावले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पॅरा खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पॅरा खेळाडूंनी अतिशय असाधारण कामगिरी केली असल्याचेही ते म्हणाले. संपूर्ण देशासाठी हा अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे! प्रत्येक खेळाडूने या ऐतिहासिक यशात योगदान दिले आहे. आपल्या कामगिरीने त्यांनी अगणित भारतीयांना प्रेरित केले आहे.

भारताने आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धा 2022 मधील 111 पदकांचा विक्रम मागे टाकला. भारताच्या पदकांमध्ये सर्वाधिक वाटा पॅरा ॲथलेटिक्सचा होता, त्यांनी 22 सुवर्ण पदकांसह 65 पदके मिळवून दिली. शीतल देवी तीन पदकांसह (दोन सुवर्ण, एक रौप्य) भारताची सर्वात यशस्वी खेळाडू ठरली.

सुरक्षा विषयक आव्हानांचा सामना करणार
व्हायब्रंट सिविल डिफेस नेटवर्क

देशात व्हायब्रंट सिविल डिफेस नेटवर्क उभे करण्यासाठी भारतीय लष्कराच्या मदतीने विशेष प्रशिक्षण उपक्रम सुरू केला जात आहे. पहिल्या टप्प्यात 12 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील नागरी संरक्षणाच्या 600 मुख्य प्रशिक्षकांना तीन दिवसांचे प्रशिक्षण दिले जाईल. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून 15 ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हायब्रंट सिविल डिफेस नेटवर्क उभारण्याची संकल्पना मांडली होती.






प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातून 50 मुख्य प्रशिक्षक यामध्ये सहभागी होतील. या प्रशिक्षणात धोक्यांबाबत जागरूकता, सुरक्षा आणि आपत्कालीन प्रतिसाद, संवाद आणि समन्वय यावर भर दिला जाईल. याअंतर्गत आधुनिक आणि संमिश्र युद्ध, ड्रोन आणि हवाई हल्ल्यांचे धोके, अग्निसुरक्षा, शोध आणि बचाव, सायबर स्वच्छता आणि नागरी-लष्करी समन्वय यांसारख्या विषयांचा समावेश आहे. प्रशिक्षणानंतर प्रत्येक मुख्य प्रशिक्षक 100 नागरी संरक्षण स्वयंसेवकांना प्रशिक्षित करेल.

E85/E100 इंधन वाहनांसाठी
बदलले नियम

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने E85 आणि E100 फ्लेक्स इंधन वाहनांना चालना देण्यासाठी केंद्रीय मोटार वाहन नियम, 1989 मध्ये सुधारणा केली आहे. पर्यावरणपूरक असलेल्या या इंधनांसाठी प्रमाणित वाहनांना लागू असलेली उत्सर्जन आणि सुरक्षा मानके पूर्ण करावी लागतील. E85 मध्ये आकारमानानुसार 85 टक्के इथेनॉल असते.

मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात उत्पादित होणाऱ्या इथेनॉलच्या अधिक वापरामुळे आयात केलेल्या कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होऊ शकते. E85 आणि E100 चा वापर केवळ विशेषत्वाने डिझाईन केलेल्या आणि प्रमाणित वाहनांमध्येच केला जाऊ शकेल. सध्याच्या वाहनमालकांना आपल्या वाहनांमध्ये बदल करण्याची गरज असणार नाही.



ॲग्री वेलफेअर पोर्टल
मोबाईलवर शेतीविषयक माहिती

देशभरातील अन्नदात्यांना आता शेती आणि कल्याणाशी संबंधित सेवांची माहिती घेण्यासाठी सरकारी कार्यालयांमध्ये फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. आता त्यांना घरबसल्या खते, बियाणे आणि योजनांची माहिती मिळेल. एकाच ठिकाणी मंत्रालयाच्या सर्व सेवा उपलब्ध असतील. यामुळे अन्नदाता डिजिटलदृष्ट्या अधिक सक्षम होईल.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शेतकऱ्यांसाठी सुधारित ॲग्री वेलफेअर पोर्टल सुरू केले आहे. सरकारी योजना, आर्थिक सहाय्य आणि शेतीशी संबंधित आवश्यक माहिती थेट शेतकऱ्यांच्या मोबाईलपर्यंत पोहोचवणे हा यामागचा उद्देश आहे. या पोर्टलवर मंत्रालयाच्या योजना, अनुदान, नियम आणि डिजिटल सेवा, हवामान, बियाणे तसेच खतांची उपलब्धता, बाजारपेठेतील भाव आणि वैज्ञानिक शेतीची माहिती मिळेल. ही सेवा कमी वेगाचे इंटरनेट आणि साध्या स्मार्टफोनवरही वापरण्यास अनुकूल असेल अशा स्वरुपात उपलब्ध करून दिली गेली आहे.



आयुष नवोन्मेष : पेटंटच्या अर्जांमध्ये 8 पटीने वाढ

आयुष क्षेत्रातील नवोन्मेष आणि बौद्धिक मालमत्ता उपक्रमांमध्ये गेल्या एका दशकभरात मोठी वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष 2014-15 ते 2025-26 दरम्यान आयुषशी संबंधित पेटंटचे 4,077 अर्ज दाखल झाले आणि 711 पेटंटना मंजुरीही दिली गेली आहे. अर्जांची वार्षिक संख्या 63 वरून वाढून 590 झाली आहे. म्हणजेच सुमारे 836.5 टक्के इतकी वाढ झाली आहे. आयुषशी संबंधित शोधांवर प्रसिद्ध झालेल्या स्थितीविषयक अहवालातून (2014-2026) ही माहिती समोर आली आहे.

कोविड-19 नंतरच्या सहा वर्षांत 2,854 अर्ज दाखल झाले, हे प्रमाण एकूण अर्जांच्या 70 टक्के इतके आहे. याच कालावधीत 657 पेटंटना मंजुरीही दिली गेली. सर्वसामान्य नागरिकांनी सर्वाधिक 2,113 अर्ज केले, तर शैक्षणिक संस्थांनी 995 अर्ज दाखल केले.

देशभरातील रामसर स्थळांची संख्या
पोहोचली 103 वर

देशभरातील रामसर स्थळांची संख्या वाढून 103 वर पोहोचली आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी सुखना पाणथळ जागा (चंदीगड) आणि सौज तलाव (उत्तर प्रदेश) या स्थळांचा या यादीत समावेश करण्यात आल्याची घोषणा केली. 2014 या वर्षात देशभरात 26 रामसर स्थळे होती. आता ही संख्या जवळपास चौपट झाली आहे. रामसर स्थळे जैवविविधतेचे संवर्धन, पुराचा प्रभाव कमी करणे, भूजल पुनर्भरण आणि उपजीविकेचे संरक्षण याबाबतीत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. भारत 1 फेब्रुवारी 1982 रोजी रामसर करारात सहभागी झाला होता.



103
एकूण रामसर स्थळे
15 ऑक्टोबर, 2026

26 वरून 103 झाली रामसर स्थळे 2014 या वर्षापासून आतापर्यंतची वाढ

13.87 लाख हेक्टरपेक्षा जास्त एकूण क्षेत्रफळ

28 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपर्यंत विस्तारली आहेत.

रामसर स्थळांमध्ये भारताचे जागतिक स्थान आशियात पहिले आणि जगात तिसरे

...आणखी वाढेल देशाची संरक्षण क्षमता


संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली 26 ऑक्टोबर 2026 रोजी झालेल्या संरक्षण खरेदी परिषदेच्या (डीएसी) बैठकीत, संरक्षण दलांसाठी 2.12 लाख कोटी रुपयांच्या भांडवली खरेदी प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. यापैकी सुमारे 82 टक्के खरेदी भारतीय उद्योगांकडून केली जाईल. यामुळे स्वदेशी संरक्षण उत्पादनाला चालना मिळेल.

भारतीय लष्करासाठी ड्रोन, पाळत ठेवणारी मानवरहित विमाने, ड्रोनविरोधी यंत्रणा, लांब पल्ल्याचे कामिकेज ड्रोन आणि स्वयंचलित गन यंत्रणेसह आधुनिक उपकरणे खरेदी केली जातील. नौदलाला जहाजविरोधी क्षेपणास्त्रांपासूनच्या संरक्षणासाठी आधुनिक प्रणाली उपलब्ध होतील. यासोबतच, वायुदलासाठी हेलिकॉप्टर, हवाई संरक्षण प्रणाली, शस्त्रास्त्रे आणि हवामान रडारलाही मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे संरक्षण दलांची पाळत ठेवण्याची क्षमता, दळणवळणीय क्षमता आणि मारक क्षमता भक्कम होणार आहे.



ज्यांनी सिद्ध केले की...

वनस्पतींनाही संवेदना असतात



जन्मः 30 नोव्हेंबर, 1858
मृत्यूः 23 नोव्हेंबर, 1937

रेडिओ विज्ञानाचे जनक आणि वनस्पतींमधील जीवन प्रक्रिया उलगडून दाखवणारे सुप्रसिद्ध वैज्ञानिक आचार्य जगदीशचंद्र बोस हे असे व्यक्तिमत्व होते ज्यांनी जगभरात भारताला गौरव मिळवून दिला. वनस्पतींनाही भावना असतात आणि त्या प्रतिसाद देतात, असा विश्वास त्यांनी जगाला दिला. त्यांच्याशी एक करुणामय नाते ठेवणेही शक्य आहे. त्याचबरोबर, बिनतारी संदेशवहनातील त्यांच्या अग्रगण्य प्रयोगांमुळे त्यांना जगभर ओळख मिळाली. शोध आणि नवोन्मेषाची त्यांची चिकाटी आजही तरुण पिढीला प्रेरणा देत आहे...

खेळता-खेळता, एका मुलाने झाडाची फांदी जोरात हलवत त्याची फुले व पाने तोडायला सुरुवात केली. त्याच वेळी, आईने मुलाला समजावून सांगितले की संध्याकाळ झाली आहे. या वेळी झाडांना आणि वनस्पतींना स्पर्श करू नकोस. त्यांची पाने तोडू नकोस. झाडे आणि वनस्पतीसुद्धा आपल्यासारखीच रात्री झोपतात. या वेळी तू असे केल्याने त्यांना खूप वेदना होतील. लहानपणी आईने सांगितलेल्या या गोष्टीचा मुलाच्या मनावर खोलवर परिणाम झाला. त्याच्या मनात एक कुतूहल निर्माण झालेः वनस्पतींना खरोखरच आपल्यासारख्याच वेदना, सुख-दुःखाची जाणीव होते का? त्या मुलाने मोठेपणी या कुतूहलाची वैज्ञानिक चाचणी घेतली. त्याने क्रेस्कोग्राफ नावाचे एक अत्यंत संवेदनशील उपकरण शोधून काढले, जे वनस्पतींच्या अगदी मंद वाढीचेही मोजमाप करू शकत होते. त्याने जगाला सिद्ध करून दाखवले की वनस्पतींनाही जीवन आणि चेतना असते. हे महान शास्त्रज्ञ दुसरे कोणी नसून जगदीशचंद्र बोस होते. 30 नोव्हेंबर 1858 रोजी बंगालमधील (सध्याचे बांगलादेश) मेमनसिंग गावात जन्मलेले जगदीशचंद्र बोस हे रेडिओ आणि सूक्ष्म तरंगांच्या प्रकाश शास्त्रावर कार्य करणारे पहिले शास्त्रज्ञ होते. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या मते, बोस हे बिनतारी रेडिओ प्रसारणाचे सह-शोधक होते. अतिसूक्ष्म विद्युत चुंबकीय लहरी निर्माण करण्यासाठी आणि पकडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यांना रेडिओ विज्ञानाचे जनक देखील मानले जाते. आज वापरली जाणारी अनेक मायक्रोवेव्ह उपकरणे, जसे की वेव्ह गाईड्स, पोलरायझर्स, डायलेक्ट्रिक लेन्सेस आणि विद्युत चुंबकीय प्रारणासाठीचे सेमीकंडक्टर डिटेक्टर्स, यांचा शोध 19व्या शतकाच्या अखेरच्या दशकात बोस यांनी लावला.

1917 मध्ये, जगदीशचंद्र बोस यांना 'नाइटहूड' ही उपाधी प्रदान करण्यात आली. लवकरच, त्यांची रॉयल सोसायटी ऑफ लंडनचे भौतिकशास्त्र आणि जीवशास्त्र विषयाचे फेलो म्हणून निवड झाली. बोस यांनी आपले संपूर्ण संशोधन कार्य महागड्या किंवा चांगल्या उपकरणांच्या आणि प्रयोगशाळांच्या सोयीशिवाय केले होते, त्यामुळे त्यांनी एक चांगली प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निश्चय केला होता. याच कल्पनेतून 'बोस इन्स्टिट्यूट' (बोस विज्ञान मंदिर) ची प्रेरणा मिळाली. आज, ही देशातील अग्रगण्य संस्थांपैकी एक मानली जाते. त्यांनी अनेक विषयांवर पुस्तकेही लिहिली. जगदीशचंद्र बोस यांचे 23 नोव्हेंबर 1937 रोजी देहावसान झाले.

असे म्हटले जाते की, जगदीशचंद्र बोस हे एक शास्त्रज्ञ असण्यासोबतच, कमी वेतनाविरोधात ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन करणारे आणि आपल्या हक्कांसाठी 'सत्याग्रह' करणारे व्यक्ती होते. 25 फेब्रुवारी 2018 रोजी 'मन की बात' कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर जगदीशचंद्र बोस यांना भारताचा अभिमान म्हटले होते. इतकेच नाही, तर 4 जानेवारी 2021 रोजी त्यांनी सांगितले की, जगदीशचंद्र बोस यांनी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये मायक्रोवेव्हची तत्त्वे सादर केली होती. आचार्य बोस यांनी त्याचा व्यावसायिक वापर केला नाही, परंतु आज रेडिओ प्रसारण प्रणाली त्याच तत्त्वांवर आधारित आहे. ■





इंडिया केम 2026

अधिक दृढ जागतिक भागीदारी

विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी एक सशक्त जागतिक रसायने आणि पेट्रोकेमिकल उद्योग अत्यावश्यक आहे. म्हणूनच सरकार देशातील रसायने क्षेत्रासाठी अत्यंत अनुकूल वातावरण उपलब्ध करून देत आहे. याच संदर्भात, 22 ऑक्टोबर रोजी मुंबईत 14 व्या 'इंडिया केम 2026' चे उदघाटन करण्यात आले. रसायने आणि पेट्रोकेमिकल क्षेत्रात जागतिक भागीदारी मजबूत करणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि शाश्वत विकासाला चालना देणे हा 'इंडिया केम 2026' चा उद्देश आहे...

2047 पर्यंत विकसित भारत घडवण्याचे देशाचे उद्दिष्ट आहे, ज्यामध्ये सरकारने सुरू केलेली तीन नवीन समर्पित रसायन पार्कसाठीची भारत औद्योगिक विकास योजना (भाव्या) महत्त्वाची भूमिका बजावेल. इंडिया केम 2026 साठीच्या आपल्या संदेशात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, व्यवसाय सुलभतेसाठीचे प्रयत्न आणि भारताचे वाढते खुले व्यापार करारांचे जाळे गुंतवणुकीसाठी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेशासाठी नवीन संधी निर्माण करत आहेत. त्यांनी विश्वास व्यक्त केला की, भारतीय रसायन उत्पादक जागतिक पुरवठा साखळीतील आपला सहभाग अधिक मजबूत करण्यासाठी या संधींचा फायदा घेतील.

केंद्रीय रसायन आणि खते तसेच आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांनी 14 व्या इंडिया केम 2026 चे उद्घाटन केले. भारतासोबत आर्थिक सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने जपान या कार्यक्रमासाठी भागीदार देश बनला आहे, ज्यामुळे रसायन आणि पेट्रोकेमिकल क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या नवीन संधी निर्माण होतील.

भारतीय रसायन उद्योग क्षेत्राच्या विकासाची नामी संधी

- भारतीय रसायने उद्योग 2030 पर्यंत 300 अब्ज डॉलर आणि 2040 पर्यंत एक ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.
- देशांतर्गत मागणीत वाढ, निर्यातीच्या वाढत्या संधी, भारताची मोठी युवा लोकसंख्या, वैयक्तिक अपेक्षांमुळे कमी वापर आणि सरकारी समर्थन उपक्रम यामुळे या क्षेत्राच्या विकासाची नामी संधी.

आठ हजारांहून अधिक प्रतिनिधींचा सहभाग

- या कार्यक्रमात जपान, अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, युरोपियन युनियन देश, लॅटिन अमेरिका आणि दक्षिण कोरिया यांसह अनेक देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.
- या कार्यक्रमात भारत आणि परदेशातील 200 हून अधिक प्रदर्शक, देश-विदेशातील आठ हजारांहून अधिक व्यावसाय धुरीण आणि 50 आघाडीच्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सहभागी झाले होते.

> *इंडिया केम 2026 उत्पादक विचारसरणींना प्रोत्साहन देईल आणि या क्षेत्राच्या दीर्घकालीन विकासाला हातभार लावणाऱ्या भागीदारीसाठी मार्ग मोकळा करेल.* **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

सरदार पटेलांनी...

हिमालयापासून हिंद महासागरापर्यंत भारताला सुरक्षित ठेवले

सरदार पटेलांच्या 151 व्या जयंतीनिमित्त (एकता दिवस) आयोजित एका भव्य कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, राष्ट्रीय एकता, अखंडता आणि सुरक्षा मजबूत करण्यात सरदार साहेबांची भूमिका ऐतिहासिक होती. केंद्र सरकारने हिमालयापासून हिंद महासागरापर्यंत भारताला सुरक्षित ठेवण्याच्या सरदार पटेलांच्या धोरणांना पुढे नेत अंतर्गत सुरक्षेच्या आघाडीवर नक्षलवादाविरोधात निर्णायक मोहीम सुरू केली आहे. त्याच वेळी, जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार, गेल्या दशकात सुमारे 50 कोटी नागरिक दारिद्र्यमुक्त झाले आहेत, जे एका नवीन, सक्षम आणि आत्मनिर्भर भारतामध्ये झालेल्या या अभूतपूर्व परिवर्तनाचे द्योतक आहे...




पंतप्रधानांच्या संपूर्ण कार्यक्रमासाठी QR कोड स्कॅन करा.

गुजरातच्या एकता नगर येथे 31ऑक्टोबर रोजी आयोजित एका कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, स्वातंत्र्य एखाद्या देशाला स्वतःचे भविष्य ठरवण्याचा अधिकार देते, तर एकता संपूर्ण देशाला एकत्र पुढे जाण्याचे सामर्थ्य देते. म्हणूनच आज देशभरात स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन आणि एकता दिन मोठ्या उत्साहाने आणि जल्लोषाने साजरे केले जातात. एकता दिन आता केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो सार्वजनिक सहभागाशी जोडलेला, सार्वजनिक अभिमानाचा उत्सव बनला आहे. सरदार पटेलांना एक महान ऐतिहासिक व्यक्तिमत्व संबोधून पंतप्रधान मोदी म्हणाले की, त्यांनी देशाची सध्याची भौगोलिक आणि राजकीय रचना घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सरदार पटेलांनी देशाला भौगोलिक आणि भावनिकदृष्ट्या एकत्र करून आधुनिक भारताचा पाया रचला आहे. सरदार पटेलांनी देशाच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा प्रारंभ करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली.

बनासकांठा येथे पंतप्रधान

गोवंश प्रजनन आणि संशोधन केंद्र



बनासकांठा येथील भिलडी येथे भारत बोवाइन ब्रीडिंग अँड रिसर्च सेंटर (बीआरसी) राष्ट्राला समर्पित करण्यात आले. 127 एकर परिसरात वसलेली ही संस्था एक अत्याधुनिक उत्कृष्टता केंद्र म्हणून स्थापित करण्यात आली आहे. कांकरेज जातीच्या गुरांसाठी समर्पित असलेली ही देशातील अशा प्रकारची पहिलीच सुविधा असेल.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी...

- थराड आणि राधनपूर येथे बनास डेअरीच्या दोन बायो-सीएनजी प्रकल्पांची पायाभरणी, ज्यांची गुरांच्या शेणावर प्रक्रिया करण्याची क्षमता अनुक्रमे 75 आणि 100 मेट्रिक टन प्रतिदिन आहे.
- अहमदाबाद मेट्रो टप्पा-2अ (विमानतळ विस्तार) आणि टप्पा-2ब (गिफ्ट सिटी विस्तार) यांची पायाभरणी. टप्पा 2अ हा कोटेश्वर रोड ते विमानतळापर्यंत पाच स्थानकांसह 6 किमी पेक्षा जास्त लांबीचा असेल, तर टप्पा 2ब हा 3.3 किमी पेक्षा जास्त लांबीचा असेल.
- अहमदाबाद-मेहसाणा रस्ता (एनएच-41) चार पदरीवरून आठ पदरी करण्यासाठी आणि त्याचे श्रेणीसुधारणेसाठी अंदाजे 2,600 कोटी रुपये खर्चाने पायाभरणी केली जात आहे.
- गुजरातमध्ये 4,030 नवीन बाल-स्नेही अंगणवाडी केंद्रांची पायाभरणी, 361 पूर्ण झालेल्या बाल-स्नेही अंगणवाडी केंद्रांचे उद्घाटन.
- पंतप्रधान कृषी पायाभूत सुविधा निधीअंतर्गत सुमारे 4,950 कोटी रुपये खर्चाचे 521 प्रकल्प पूर्ण होऊन राष्ट्राला समर्पित करण्यात आले.
- देशभरातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी पीएम-किसान योजनेचा 19,000 कोटी रुपयांचा 24 वा हप्ता वितरित करण्यात आला.

400 कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी...

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकता नगरमध्ये 400 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली.

गुजरातमधील सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीद्वारे त्यांनी देशाच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा मार्गही प्रशस्त केला. राष्ट्रीय एकतेचे भव्य सोहळे, जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा, जलद आर्थिक विकास आणि काशी विश्वनाथ मंदिरापासून ते राम मंदिरापर्यंत होत असलेल्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा उल्लेख करत पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज देश सरदार पटेलांनी पाहिलेल्या त्याच मार्गावर पुढे वाटचाल करत आहे.

सरदार पटेलांच्या 150 व्या जयंतीनिमित्त गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेल्या देशव्यापी सोहळ्यांची आठवण करून देताना पंतप्रधान म्हणाले की, या काळात देशाने अनेक महत्त्वाचे संकल्प केले होते. देशाने हे संकल्प अल्पावधीत पूर्ण केल्याबद्दल सरदार पटेलांच्या 151 व्या जयंतीदिनी समाधान व्यक्त केले. पंतप्रधान मोदी म्हणाले, "या दोन वर्षांत देशाने असे अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत, जे यापूर्वी कधीही झाले नव्हते."

सरदार पटेलांच्या 150 व्या जयंतीनिमित्त त्यांच्या चरणी नक्षलवाद आणि माओवादी दहशतवाद पूर्णपणे संपुष्टात येईपर्यंत स्वस्थ न बसण्याची शपथ घेतल्याचे स्मरण करून पंतप्रधान मोदी म्हणाले की, केवळ एका वर्षात डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीपणाचा कणा मोडला आहे. पंतप्रधान म्हणाले की, अनेक दशकांपासून हिंसाचाराने प्रभावित झालेले भाग आता विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होत आहेत. जागतिक बँकेच्या एका अहवालाचा हवाला देत त्यांनी सांगितले की, 2024 पूर्वीच्या 10-12 वर्षांत 50 कोटी भारतीय गरिबीतून बाहेर आले. पूर्वी प्रत्येक 100 लोकांपैकी 27 जण अत्यंत गरिबीत अडकले होते, तर आज हा आकडा 3 पेक्षा कमी झाला आहे. ■

जेव्हा 'वी द पीपल' बनला जनतेचा उत्सव




त्या वेळी देशाची लोकसंख्या जेमतेम 36 कोटी होती, संसाधने मर्यादित होती आणि आव्हाने अनंत होती... तरीही, संविधान सभेने आपल्या अथक प्रयत्नांतून 26 नोव्हेंबर 1949 रोजी राष्ट्राला तो अजरामर दस्तावेज सादर केला, त्याने प्रत्येक भारतीयाची स्वप्ने, संघर्ष आणि आकांक्षांना शब्दबद्ध केले. ही ऐतिहासिक तारीख इतिहासाच्या पानांतच कुठेतरी हरवून जाईल, याची तेव्हा क्वचितच कोणी कल्पना केली असेल. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2015 मध्ये ही विस्मृतीत गेलेली तारीख पुनरुज्जीवित केली आणि संविधान दिन सर्वांसाठी एक खरा उत्सव बनवला.

या 26 नोव्हेंबर रोजी, देश आपला 12 वा संविधान दिन साजरा करेल. हा 77 वर्षांच्या प्रवासाचा एक उत्सव आहे, ज्यामध्ये 'वी द पीपल' ही साद आता केवळ प्रस्तावनेतील तीन शब्दांपुरती मर्यादित राहिलेली नाही. ही भावना आज प्रत्येक नवीन न्याय आणि कायद्याच्या निष्पक्षतेमध्ये सामावलेली आहे, प्रत्येक लाभार्थ्याच्या डोक्यावरील पक्क्या छतात जागृत आहे, शेतकऱ्याच्या खात्यात थेट जमा होणाऱ्या मानधनात ती प्रतीत होते आणि सुलभ जीएसटी प्रणालीद्वारे हास्य फुलवते. लोकशाहीची जननी असलेल्या भारताचा हा अभिमान आज जागतिक स्तरावर घुमत आहे. हा संकल्पापासून ते सिद्धीपर्यंतचा प्रवास आहे, जो एका विकसित भारताकडे घेऊन जातो, ज्यासाठी संविधान आता केवळ एक ग्रंथ राहिलेले नाही, तर ते 140 कोटी भारतीयांची सामायिक भावना बनले आहे...

जर मानवनिर्मित कोणताही दस्तावेज खऱ्या अर्थाने अमर म्हणता येत असेल, तर ते भारताचे संविधान आहे. गेल्या 12 वर्षांत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधानाला राष्ट्राचा पवित्र ग्रंथ आणि मार्गदर्शक मानून, देशाला अनेक दशकांपासून वंचित असलेल्या विकासाचा पाया घातला आहे. ज्या समस्यांना राजकारणी पूर्वी आपले नशीब मानत होते, त्या समस्यांना पंतप्रधानांनी स्पर्श केला आहे आणि त्यावर उपाययोजनाही करून दाखवल्या आहेत. संविधान आता केवळ कायद्याचे पुस्तक राहिलेले नाही, तर ते एक खरा सामाजिक दस्तावेज बनले आहे. या 26 नोव्हेंबर रोजी, संविधान स्वीकारल्याला 77 वर्षे पूर्ण होताना देश आपला 12 वा संविधान दिन साजरा करत आहे. गेल्या दशकात, "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास" ही संविधानाच्या भावनेची सर्वात प्रभावी अभिव्यक्ती बनली आहे.

एका विस्मृतीत गेलेल्या तारखेपासून राष्ट्रीय उत्सवापर्यंत

जेव्हा 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले, तेव्हा हा ऐतिहासिक दिवस अनेक दशके इतिहासाच्या पानांत दडलेला होता. 19 नोव्हेंबर 2015 रोजी, भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने एक अधिसूचना जारी करून हा दिवस 'संविधान दिन' म्हणून औपचारिकपणे साजरा करण्यास सुरुवात केली. म्हणजे संविधान स्वीकारल्यावर 65 वर्षांनी. ही कल्पना तेव्हा सुचली, जेव्हा देशात डॉ. भीमराव आंबेडकर यांची 125 वी जयंती साजरी होत होती. ज्यांनी संविधानाचा नजराणा दिला, त्यांना सदैव स्मरणात ठेवण्याचा याहून अधिक पवित्र प्रसंग असू शकत नाही, याची आठवण खुद्द पंतप्रधान मोदींनी करून दिली. विशेष म्हणजे, पंतप्रधान मोदींनी संविधानासाठी एखादा विशेष दिवस साजरा करण्याची ही पहिली वेळ नव्हती. यापूर्वी 2009 मध्ये, जेव्हा ते गुजरातचे मुख्यमंत्री होते, तेव्हा राज्य सरकारने संविधानाचा 60 वा वर्धापन दिन एक विशेष औचित्य म्हणून साजरा केला होता.



राष्ट्र प्रथम, संविधान प्रथम

(प्रवासाची एक झलक)

2 वर्ष 11 महिने 18 दिवस
हा संविधान सभेच्या अथक परिश्रमाचा कालावधी

60 हून अधिक देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून आणि 2,000 हून अधिक दुरुस्त्या करून राज्यघटनेला अंतिम स्वरूप देण्यात आले

26 नोव्हेंबर 1949
राज्यघटना अंमलात आली

26 जानेवारी 1950
संविधान लागू झाले, भारत एक प्रजासत्ताक बनला

19 नोव्हेंबर 2015
26 नोव्हेंबर हा 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्यासाठी अधिसूचना जारी

2024
राज्य घटनेच्या स्विकृतीला 75 वर्षे पूर्ण, 10 वा संविधान दिन साजरा करण्यात आला.

25 जून 2025
आणीबाणी लागू झाल्याला 50 वर्ष पूर्ण, 'संविधान हत्या दिन' म्हणून स्मरण केले जाते

26 नोव्हेंबर 2025
76वा संविधान दिन संविधान @75 मोहिमेची सांगता. संविधानाच्या प्रती आणखी 9 भाषांमध्ये प्रदर्शित

26 नोव्हेंबर 2026
12 वा संविधान दिन, संविधानाच्या स्विकृतीला 77 वर्षे पूर्ण

एक विशेष उपक्रम साजरा करण्यात आला. हत्तीवर संविधान आरूढ करून एक शोभायात्रा काढण्यात आली होती, ज्यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री मोदी स्वतः सर्वात पुढे मार्गक्रमण करत होते.

26 नोव्हेंबर शिवाय 26 जानेवारीचे महत्व अपूर्ण आहे. 26 जानेवारीची खरी ताकद 26 नोव्हेंबरमध्येच दडलेली आहे. हाच दृष्टीकोन सामोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधान दिनाला एका सार्वजनिक उत्सवाचे स्वरूप दिले. आता दरवर्षी केंद्र ते जिल्हास्तरापर्यंत भाषण स्पर्धा, कार्य कर्तृत्वाबाबत व्याख्याने, प्रतिज्ञांचे सामूहिक वाचन, चित्रपट प्रदर्शन आणि शाळांमध्ये 'आपले संविधान जाणून घ्या' यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. 26 नोव्हेंबर 2025 रोजी 76 व्या संविधान दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली संविधान भवनाच्या ऐतिहासिक सेंट्रल हॉलमध्ये एका राष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये उपराष्ट्रपती, पंतप्रधान लोकसभेचे अध्यक्ष आणि दोन्ही सभागृहांचे



खासदार सहभागी झाले होते. याप्रसंगी संविधान विभागाद्वारे तयार करण्यात आलेले भारताचे संविधान - मल्याळम, मराठी, नेपाळी, पंजाबी. बोडो, काश्मिरी, तेलुगू, ओदिया आणि आसामी या नऊ भाषांमध्ये प्रकाशित करण्यात आले. 'भारताच्या संविधानातील कला आणि कॅलिग्राफी' नावाने एक स्मरणिका पुस्तिका देखील प्रकाशित करण्यात आली. त्याच दिवशी डॉक्टर आंबेडकर फाउंडेशनने 'एक जिवित संविधान : लोकशाही, प्रतिष्ठा आणि विकासाची 75 वर्षे' या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित करून आपल्या वर्षभरात चाललेल्या संविधान@75 मोहिमेचा समावेश केला. मात्र, संविधान दिनाचे महत्त्व समजून घेण्यासाठी लोकशाही इतिहासाच्या त्या काळ्या पानांकडेही पाहिले पाहिजे, ज्यात नागरिकांचे मूलभूत हक्कसुद्धा हिरावून घेतले गेले होते. प्रसारमाध्यमांवर मुद्रण नियंत्रण लागू केलं होते आणि विरोधाचे हुंकार तुरुंगात डांबण्यात आले होते.

संविधान आणि आणीबाणीची काळी रात्र

आज देश अभिमानाने संविधान दिन साजरा करतो आणि तो एक राजकीय उत्सव बनला आहे. पण एक काळ असाही आला होता जेव्हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीच्या इतिहासात एका काळ्या अध्यायाची नोंद झाली. 'अंतर्गत यादवी'च्या नावाखाली 25 जून 1975 रोजी देशात आणीबाणी लादण्यात आली. मंत्रिमंडळाच्या मंजुरी शिवाय आणीबाणी लादण्यात आल्याचे हे एकमेव उदाहरण होते. वास्तविक पाहता सरकार प्रत्येक निर्णय नियमांनुसार घेते, मात्र हे एक असे उदाहरण आहे तिथे

> *आम्ही आमच्या लोकशाही आदर्शांना आणि संविधानाला सर्वांपेक्षा श्रेष्ठ मानतो. त्यामुळे आम्ही 25 जून कधीही विसरू शकत नाही. या दिवशी आपल्या देशावर आणीबाणी लादण्यात आली होती. हा भारताच्या इतिहासातील एक काळापुट्ट काळ होता. लोकशाहीच्या समर्थकांवर त्या काळात एवढे अत्याचार झाले की आजही त्या आठवणींनी अंगावर काटा येतो.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**


मंत्र्यांनाही त्याची कल्पना नव्हती. अशातच तत्कालीन राष्ट्रपतींनी हे प्रकरण मंत्रिमंडळासमोर आणण्यास सांगितले आणि 26 जून रोजी सकाळी सहा वाजता मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली. 26 जून रोजी पत्रकारितेवर मुद्रण नियंत्रणाबाबत आणखी एक आदेश जारी करण्यात आला. त्या काळाबद्दल प्रसार भारतीचे माजी अध्यक्ष ए सूर्यप्रकाश यांनी लिहीले आहे, "कदाचित हे एक दुर्मिळ उदाहरण असेल की, हेच नव्हे तर आणीबाणीच्या बातम्यांचे प्रकाशान रोखण्यासाठी 25 जूनच्या रात्री दिल्लीतील बहादूर शाह जाफर मार्गावरील वृत्तपत्र कार्यालयांची वीज कापण्यात आली होती. बंगळुरू हे देखील हुकूमशाही वृत्ती आणि विचित्र निर्णयांचे एक उदाहरण आहे.

संविधान दिन...

भारताचे संविधान 26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान सभेने स्विकारले. भारताची राज्यघटना 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आली. 2015 मध्ये सरकारने या पवित्र दस्तऐवजाच्या सन्मानार्थ 26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून घोषित केला.

भारतीय संविधानाशी संबंधित काही मनोरंजक तथ्ये...

- भारताच्या जनतेची पहिली प्रतिनिधी संस्था असलेल्या संविधान सभेने 9 डिसेंबर 1946 रोजी आपल्या महत्वाच्या कार्याला सुरुवात केली.
- राज्यघटनेच्या निर्मितीच्या प्रक्रिये दरम्यान 53,000 हून अधिक नागरिकांनी सुमारे तीन वर्ष संविधान सभेच्या प्रेक्षक गॅलरीत बसून चर्चा वाद विवाद पाहिल्या आणि ऐकल्या.
- राज्यघटना तयार करायला 2 वर्ष 11 महिने आणि 18 दिवस लागले.
- घटनेच्या विविध तरतुदींवर 1,100 तास आणि 32 मिनिटे चर्चा झाली.
- 7 सदस्यीय मसुदा समितीने त्याला अंतिम स्वरूप दिले.
- भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. ते लागू झाले तेव्हा त्यात 395 कलमे, 22 भाग आणि 8 अनुसूची होत्या.



- भारताचे संविधान टंकलिखित किंवा मुद्रीत केले गेले नव्हते. ते इंग्रजी आणि हिंदीमध्ये हस्तलिखित होते. त्यात अंदाजे 90,000 शब्द होते.
- आचार्य नंदलाल बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शांती निकेतन येथील कलाकारांनी संविधान हाती सजवले होते. हा मजकूर दिल्लीतील प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी हस्तलिखित केला होता.
- संसद भवनाच्या ग्रंथालयात नायट्रोजन वायूने भरलेल्या विशेष पात्रांमध्ये संविधानाच्या मूळ प्रति सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.
- संविधानाच्या प्रत्येक विभागाची सुरुवात भारतीय इतिहासातील एका टप्प्याच्या किंवा दृश्याच्या चित्रणाने होते. ही चित्रे नंदलाल बोस यांनी चित्रित केली होती. संविधानामध्ये एकूण 22 चित्रे आणि कलाकृती आहेत.



- 24 जानेवारी 1950 रोजी संविधान सभेच्या 284 सदस्यांनी नवी दिल्लीतील संविधान सभागृहात भारताच्या राज्यघटनेवर स्वाक्षरी केली.
- संविधान सभेची अंतिम बैठक 24 जानेवारी 1950 रोजी झाली. या बैठकीत डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांना भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून घोषित करण्यात आले.
- संविधान सभेत सरोजिनी नायडू, राजकुमारी अमृत कौर, हंसा मेहता, सुचेता कृपलानी आणि जी दुर्गाबाई यांच्यासह 15 महिला सदस्य होत्या.
- भारताचे संविधान 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आले. भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर जी व्ही मावळंकर लोकसभेचे पहिले अध्यक्ष झाले.



त्यावेळी मी बंगळुरूच्या इंडियन एक्सप्रेस मध्येच काम करत होतो. तिथे पूर्व सेन्सॉरशिप लागू करण्यात आली होती. याची जबाबदारी बंगळुरूच्या तत्कालीन पोलीस आयुक्तांवर सोपवण्यात आली होती. याचा अर्थ असा की एका गणवेशधारी अधिकाऱ्यालाच एक प्रकारे आमचा संपादक बनवण्यात आले होते. काय प्रकाशित करायचे आणि काय नाही हे तेच ठरवत असत. कोणते शब्द किंवा छायाचित्र समाविष्ट करायचे किंवा वगळायचे हेही तेच ठरवत असत. प्रेस कौन्सिल कायदाही रद्द करण्यात आला होता. अनेक पत्रकारांना तुरुंगात पाठवण्यात आले."

त्या काळाची आठवण करून देताना ते पुढे लिहितात, "मला तेव्हाचा आणखी एक किस्सा लक्षात आहे. तत्कालीन माहिती आणि प्रसारण मंत्र्याच्या आदेशानुसार डीएव्हीपी आणि ऑल इंडिया रेडिओला पहाटे फोन करून सर्व भाषांतरकारांना शास्त्री भवन मध्ये बोलावण्यात आले होते. सुमारे दहा पंधरा भाषांतरकारांना ज्यांना काहीच माहिती नव्हते त्यांना दुपारी दोन वाजता विश्व युवक केंद्रात नेण्यात आले आणि दुपारी दोनच्या सुमारास एका खोलीत बंद करण्यात आले. त्यांना इंग्रजीमध्ये छापलेला काँग्रेसचा जाहीरनामा देण्यात आला ज्याचे 15 भाषांमध्ये भाषांतर करायचे होते. रात्री 10-12 वाजण्याच्या सुमारास आपले काम पूर्ण झाल्यावरच त्यांना घरी जायला मिळाले." आणीबाणी संदर्भात लोकसभेत झालेल्या एका चर्चासत्रात पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, "25 जूनच्या त्या रात्री देशाचा आत्मा चिरडून टाकण्यात आला होता. भारतातील लोकशाहीचा जन्म संविधानाच्या पानांमधून झालेला नाही, भारतातील लोकशाही युगानुयुगे आमचे चैतन्य होते. हे चैतन्य चिरडून टाकण्यात आले. देशातील माध्यमे चिरडून टाकण्यात आली. देशातील थोर पुरुषांना तुरुंगात डांबण्यात आले. संपूर्ण भारताला बंदिवान करून तुरुंगवासी बनवण्यात आले होते- आणि हे केवळ कोणाचीही सत्ता जाऊ नये यासाठीच केले गेले. न्यायपालिकेचा निर्णय होता, मात्र न्यायपालिकेचा कसा अनादर केला जातो त्याचे हे एक जिवंत उदाहरण आहे."

आणीबाणीच्या काळात लिहिलेल्या टॉर्चर ऑफ पॉलिटिकल प्रिझनर्स इन इंडिया या पुस्तकात तत्कालीन सरकारने लोकशाहीच्या रक्षकांना कशी क्रूर वागणूक दिली याचे वर्णन करण्यात आले आहे. देशाच्या स्वातंत्र्याला धोका निर्माण करणाऱ्या या गुन्ह्यांचा सर्वांनी जरूर आढावा घ्यावा असे मी आवाहन करतो. यामुळे आजच्या तरुण पिढीला लोकशाहीचा अर्थ आणि महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होईल.

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

...त्यानंतर घटनादुरुस्तीने आणीबाणी लादणे अशक्य झाले

आणीबाणीच्या काळात संविधानातील अनेक तरतुदी बदलण्यात आल्या होत्या. त्यानंतर मोरारजी देसाई सरकारच्या काळात त्या दुरुस्त करण्यात आल्या. हे महत्त्वाचे एवढ्याचसाठी आहे कारण आणीबाणीच्या काळात आणलेली 42 वी घटनादुरुस्ती ज्यात सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार मर्यादित केले होते आणि ज्यात आपल्या लोकशाही मूल्यांचे उल्लंघन करण्यासारख्या काही तरतुदी होत्या ती 44 व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून पुनर्संचयित करण्यात आली. या दुरुस्त्यांमध्ये अशीही तरतूद केली की संविधानाच्या अनुच्छेद 20 आणि 21 अंतर्गत आम्ही दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आणीबाणीच्या काळातही केले जाऊ शकत नाही.

देशात पहिल्यांदाच अशी तरतूद करण्यात आली की केवळ मंत्रिमंडळाच्या लेखी शिफारसीनुसारच राष्ट्रपती आणीबाणी जाहीर करू शकतात. आणीबाणीचा कालावधी एकावेळी सहा महिन्यापेक्षा जास्त वाढवता येणार नाही असेही ठरवण्यात आले. अशा प्रकारे मोरारजी सरकारने देशात 1975 सालच्या आणीबाणी सारख्या परिस्थितीची पुनरावृत्ती कधीच होता कामा नये हे सुनिश्चित करण्यात

राज्यघटना आणि आणीबाणी



आणीबाणी...

25 जून 1975 रोजी तत्कालीन राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी अंतर्गत अशांततेचे कारण दाखवत संविधानाच्या कलम 352 नुसार आणीबाणी जाहीर केली. 24 जून 1975 ची रात्र ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात लांब रात्र होती कारण तिची सकाळ 21 महिन्यांनंतर झाली. 25 जून 1975 ते 21 मार्च 1977 पर्यंत आणीबाणी लागू राहिली.

- ही भारताच्या इतिहासातील तिसरी आणीबाणी होती परंतु शांततेच्या काळात लादण्यात आलेली पहिलीच होती.
- यापूर्वी 1962 मध्ये चीन सोबत आणि 1971 मध्ये पाकिस्तान सोबत झालेल्या युद्धादरम्यान आणीबाणी लागू करण्यात आली होती.
- त्यावेळी कलम 352 मध्ये युद्ध, बाह्य आक्रमण किंवा अंतर्गत अशांततेच्या कारणास्तव आणीबाणी जाहीर करण्याची तरतूद होती.
- विरोधी पक्षातील 1 लाख 10 हजार राजकीय नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले.
- 26 जून 1975 पासून सर्व वृत्तपत्रांवर पूर्व सेन्सॉरशिप लादण्यात आली.
- बातम्या, संपादकीय आणि छायाचित्र प्रकाशित करण्यापूर्वी संपादकांना सरकारकडून परवानगी घेणे बंधनकारक होते.



- सेन्सॉरशिप लागू करण्याच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये दिल्लीतील वृत्तपत्रांच्या कार्यालयांचा विजय पुरवठा खंडित करण्यात आला होता.
- कार्यकर्ते, स्वतंत्र संपादक, पत्रकार, असंतुष्ट विद्यार्थी नेते आणि विविध सर्जनशील कामांमध्ये गुंतलेल्यांनाही तुरुंगात टाकण्यात आले.
- सामग्रीवर नियंत्रण : संसदीय आणि न्यायालयीन कामकाजावर सेन्सॉरशिप लादण्यात आली. न्यायालयाच्या निर्णयांचे प्रकाशित स्वरूप बदलण्यात आले किंवा त्यावर नियंत्रित आणण्यात आले.
- माध्यमांचे वर्गीकरण : वृत्तपत्रांचे वर्गीकरण त्यांची संपादकीय भूमिका आणि वार्तांकनाच्या आधारावर केले जाते. अनुकूल, तटस्थ किंवा प्रतिकूल म्हणून वर्गीकृत केले आहे.
- राज्यघटनेचा इतका गैरवापर झाला की भारतीय लोकशाही हे कायम एका दुःस्वप्नाप्रमाणे लक्षात ठेवेल.



आले. म्हणजे जेव्हा मोरारजी देसाई पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी आणीबाणीच्या काळात संविधानात झालेल्या चुका सुधारण्यात आल्या. न्यायपालिका, संसद आणि प्रसार माध्यमांसह नागरिकांचे अधिकार पुनर्स्थापित करण्यात आले. त्यामुळे मोरारजी देसाई यांचे विशेष स्मरण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक प्रसंगी म्हटले आहे की, "अशा प्रकारे मोरारजी भाईंनी हे सुनिश्चित केले की 1975 मध्ये आणीबाणी लागू करून लोकशाहीची ज्या प्रकारे हत्या करण्यात आली त्याची भविष्यात पुनरावृत्ती होणार नाही. राष्ट्राच्या रक्षणासाठी त्यांनी दिलेले अमुल्य योगदानाचे भावी पिढी सदैव स्मरण करेल. अशा या महान नेत्याला मी पुन्हा एकदा श्रद्धांजली अर्पण करतो."

लोकांचे घटनात्मक अधिकार, सरकारची वचनबद्धता

देशाच्या नवीन पिढीला आणीबाणीतल्या घटनांची जाणीव असली पाहिजे कारण भारताच्या लोकांची तीच ताकद आहे की त्यांनी लोकशाहीचा

आणीबाणीच्या काळात राज्यघटनेत केलेल्या दुरुस्त्या

आणीबाणीच्या काळात संविधानात इतक्या दुरुस्त करण्यात आल्या की त्याला संविधानाची 'लघु आवृत्ती' म्हटले जाऊ लागले. प्रस्तावना बदलण्यात आली, अनुच्छेद 14 मध्ये बदल करण्यात आला, 7 परिशिष्टे बदलली गेली. 40 वेगवेगळी कलमे बदलण्यात आली. नवीन अनुच्छेद जोडण्यात आले आणि नवीन विभाग समाविष्ट करण्यात आले.

- **38 वी घटनादुरुस्ती:** राष्ट्रपतींच्या आणीबाणी जाहीर करण्याच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यास मनाई करण्यात आली.
- **39वी घटना दुरुस्ती:** पंतप्रधान आणि लोकसभा अध्यक्षांची निवड प्रक्रिया न्यायालयीन छाननीतून वगळण्यात आली.
- **42वी घटनादुरुस्ती:** केंद्र सरकारच्या अधिकारांचा आणखी विस्तार केला. मुलभूत हक्कांपेक्षा ध्येय धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांना प्राधान्य देण्यात आले. यात संविधानाची मुलभूत रचनाच बदलण्यात आली.
- **42वी घटनादुरुस्ती:** घटना दुरुस्तीच्या न्यायालय पुनर्विलोकनास मनाई करण्यात आली.
- घटना दुरुस्तीच्या 69 व्या कलमाने सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारही काढून घेतले.
- लोकसभा आणि राज्य विधानसभेचा कार्यकाळ पाच वर्षांवरून सहा वर्षांपर्यंत वाढवण्यात आला





लोकसभा निवडणुकीनंतर आणीबाणी संपुष्टात आली

- 16 मार्च ते 20 मार्च दरम्यान लोकसभा निवडणूक झाल्या आणि 21 मार्च 1977 रोजी आणीबाणी उठवण्यात आली.
- 44 वी घटनादुरुस्ती 1978 मध्ये अंमलात आली. या दुरुस्तीने आणीबाणी लागू करण्याचा आधार म्हणून अंतर्गत अशांततेच्या जागी सशस्त्र बंड हा घटक आणला गेला.
- न्यायालयीन समीक्षा पुनर्संचयित करण्यात आली. भविष्यातील आणीबाणीच्या घोषणेसाठी कायदेशीर सुरक्षा उपाय योजना जोडण्यात आल्या.
- 44 व्या घटना दुरुस्तीने अशी ही तरतूद केली की संविधानाच्या अनुच्छेद 20 आणि 21 अंतर्गत प्राप्त झालेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आणीबाणीच्या काळातही केले जाऊ शकत नाही.
- देशात पहिल्यांदाच अशी प्रणाली तयार करण्यात आली की मंत्री मंडळाच्या लेखी शिफारशीनुसारच राष्ट्रपती आणीबाणी जाहीर करतील.
- असेही ठरवण्यात आले की आणीबाणीचा कालावधी एकावेळी सहा महिन्यांहून जास्त वाढवता येणार नाही.

अनुभव घेतला आहे. या देशातील जनतेने संधी मिळताच आपली लोकशाहीची ताकद दाखवून दिली आहे. ही कोणत्याही देशासाठी एक महत्त्वाची शक्ती ठरली आहे. जनतेच्या सामर्थ्याची जाणीव त्यांना करून दिली पाहिजे. लोकशाहीच्या समर्थकांनी एवढी मोठी लढाई कशी लढली आणि जनमानसाच्या नसानसांत लोकशाही कशी भिनली आहे, हे त्यांनी निवडणुकांच्या माध्यमातून दाखवून दिले आहे. हा भारताचा अमर वारसा आहे. आणीबाणीची वर्षगाठ आपल्याला हा वारसा आणखी बळकट करण्याची आठवण करून देते. गेल्या 12 वर्षात संविधान दिनाने देशात एक नवीन जागृती निर्माण केली आहे. केंद्र सरकार आज लोकांच्या घटनात्मक अधिकारांचे रक्षण करत आहे. आजच्या काळात तेव्हाच्या परिस्थितीची कल्पनाही करता येणे शक्य नाही. आज आपण वर्तमानपत्रांमध्ये लेख लिहू शकतो, समाज माध्यमांवर आपल्याला जे काही लिहायचे ते लिहू शकतो, बोलू शकतो. सरकार विरोधात आवाज उठवू शकतो. आपल्याला एवढी ऊर्जा कुठून

नव्या पिढीचे कायदे

न्यायप्रणाली आता अधिक जलद, सोपी आणि भारतीय स्वरूपाची आहे

- भारतीय दंड संहितेमध्ये (आयपीसी च्या जागी) 511 ऐवजी आता 358 कलम आहे. 20 नवीन गुन्हे समाविष्ट करण्यात आले आहेत, 23 गुन्ह्यांसाठी अनिवार्य किमान शिक्षेची तरतूद आहे आणि 6 गुन्ह्यांसाठी सामुदायिक सेवेची तरतूद आहे.
- भारतीय नागरी संरक्षण संहितेमध्ये (फौजदारी प्रक्रिया संहितेच्या जागी) आता 484 कलमांऐवजी 531 कलमे असून 9 नवीन कलमे जोडण्यात आली आहेत.
- भारतीय पुरावा कायद्यात (एव्हिडन्स ॲक्टच्या जागी) 167 ऐवजी आता 170 कलमे आहेत.
- राजद्रोहा ऐवजी देशद्रोहाची तरतूद - सरकारवर टीका करणे हा आता गुन्हा राहिलेला नाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य अधिक मजबूत करण्यात आले आहे.

एकूण **3,200**

सूचना आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या 158 बैठकांनंतर हे कायदे तयार करण्यात आले आहेत.



“आपल्या संविधानाच्या मूळ तत्वांचे कसे उल्लंघन केले गेले, संसदेचा आवाज कसा दाबला गेला आणि न्यायालयांना नियंत्रण मिळवण्याचा कसा प्रयत्न केला गेला हे कोणताही भारतीय कधीही विसरणार नाही. 42 वी घटनादुरुस्ती हे त्यांच्या कपट आणि विश्वासघाताचे उत्तम उदाहरण आहे. गरीब, वंचित आणि दलितांना विशेषतः लक्ष्य करण्यात आले, ज्यात त्यांच्या प्रतिष्ठेचा अपमान करणेही समाविष्ट होते.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

मिळाली ? वास्तविक पाहता,भारताच्या विद्यमान नेतृत्वाने ती आणीबाणी जवळून अनुभवली आहे, तिचे दुःख त्यांना जाणवत आहे. ही ऊर्जा त्या आणीबाणीच्या बंधनातून विरोध करण्याच्या याच स्वरातून निर्माण होते. याच कारणासाठी गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी संविधानाला 60 वर्ष पूर्ण झाल्या निमित्त संविधान गौरव यात्रा काढली होती, आणि पंतप्रधान झाल्यावर त्यांनी 26 नोव्हेंबर ही तारीख सुद्धा संविधान दिन म्हणून प्रस्थापित केली.

“वी द पीपल” - एक आव्हान, एक प्रतिज्ञा, एक विश्वास

सर्वोच्च न्यायालयात आयोजित संविधान दिनाच्या सोहळ्यात पंतप्रधान मोदी एकदा म्हणाले होते की संविधानाच्या प्रस्तावनेतील पहिले तीन शब्द “वी, द पीपल” हे केवळ शब्द नसून एक आव्हान, एक प्रतिज्ञा आणि एक विश्वास आहेत. याच भावनेने 26 नोव्हेंबर 2025 रोजी पंतप्रधानांनी देशवासियांना उद्देशून एक पत्र लिहून 1949 मध्ये संविधानाचा ऐतिहासिक स्विकार केल्याची आणि राष्ट्राच्या प्रगतीमधील त्याच्या चिरस्थायी भूमिकेचे स्मरण केले. एका समाज माध्यम पोस्टमध्ये त्यांनी संविधानाच्या निर्मात्यांना आदरांजली वाहिली आणि संविधान मानवी प्रतिष्ठा, समानता आणि स्वातंत्र्य यांना सर्वोच्च महत्व देते यावर भर दिला. त्यांनी हेही सांगितले की संविधान दिन विशेष महत्त्वाचा आहे कारण याच दिवशी सरदार वल्लभ भाई पटेल आणि भगवान बिरसा मुंडा यांची 150 वी जयंती, वंदे मातरमचा 150 वा वर्धापन दिन आणि गुरु तेग बहादूरजी यांच्या

360व्या शहीद दिन स्मृतिवर्षाशी सुसंगत होता. म्हणजेच एकता, बलिदान, राष्ट्रभक्ती आज धर्म रक्षण अशा चार महान वारशांचा एकाच कालखंडात झालेला संगम !

12 व्या संविधान दिनी तर हे स्मरण अधिकच प्रासंगिक ठरते कारण हे वर्ष देखील, त्याच ऐतिहासिक स्मृतींच्या मालिकेतील एक टप्पा आहे, जेव्हा राष्ट्र आणीबाणीचे ते काळे दिवस कधीही विसरु शकत नाही. 2025 मध्ये या आणीबाणीला 50 वर्षे पूर्ण झालीत. पंतप्रधानांनी हे स्पष्ट सांगितले होते की 25 जून 1975 रोजी भारताच्या लोकशाहीवर जो कलंक लागला होता, नवी पिढी ते कधीही विसरणार नाही आणि देशाच्या गौरवासोबतच आपले संविधान आणि लोकशाहीच्या परंपरांचे रक्षण करण्याचा संकल्प करेल.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याला नवे बळ

संविधानाची सर्वात मोठी परीक्षा म्हणजे, त्यामागची मूळ भावना - म्हणजे अधिकार आणि कर्तव्यांचे संरक्षण करणे ही आहे. दुर्दैवाने, संविधानात करण्यात आलेल्या पहिल्याच दुरुस्तीत अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली गेली होती. इंग्रज शासन काळात करण्यात आलेला राजद्रोहाचा कायदा स्वतंत्र भारतातही कित्येक दशके लागू राहिला. तोच कायदा, ज्या अंतर्गत, महात्मा गांधी, बाळ गंगाधर टिळक आणि वीर सावरकर यांच्यासारखे लोक कित्येक वर्षे तुरुंगात राहिले. केंद्र सरकारने आता भारतीय न्याय संहिता लागू करून राजद्रोहाच्या जागी देशद्रोहाची तरतूद केली आहे. यामुळे सरकारवर केलेली टीका, फौजदारी गुन्ह्यांच्या श्रेणीतून वगळण्यात आली आहे, तर देशाविरुद्ध केलेली कृत्ये मात्र अत्यंत कठोर शिक्षेसाठी पात्र असल्याची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे.

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम यांच्या रूपाने, देशाच्या फौजदारी गुन्हे प्रणालीने 19 व्या शतकातील बेड्यांतून मुक्त होत एकविसाव्या शतकात प्रवेश केला आहे. या कायद्यासंदर्भात गृह मंत्रालयाने 2019 पासून सखोल विचार - विनिमय केला, ज्यात एकूण 3,200 सल्ले/सूचना देण्यात आल्या आणि केंद्रीय गृहमंत्र्यांनी 158 बैठका केल्या. छोट्या आणि पहिल्यांदाच केल्या गेलेल्या गुन्ह्यांमध्ये तुरुंगाच्या ऐवजी सामुदायिक सेवेची तरतूद, तंत्रज्ञानाचा वापर करत कालबध्द न्यायाची व्यवस्था आणि देशभरात एकसमान न्याय प्रणाली, ह्या सगळ्या सुधारणा, संविधानाची मूळ भावना, म्हणजे सगळ्यांना समान न्याय उपलब्ध असणे, हे तत्व प्रत्यक्षात अंमलात आणण्याच्या दिशेने उचलण्यात आलेली महत्वाची पावले आहेत.

जम्मू काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत एक संविधान



कलम 370 रद्दबातल

ऑगस्ट 2019 मध्ये जम्मू काश्मीर मधून कलम 370 रद्द करण्यात आले, त्यामुळे तिथे भारतीय संविधान पूर्णपणे लागू होऊ शकले.

EWS आरक्षण (103वी दुरुस्ती)

सामान्य वर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (**EWS**) 10 टक्के आरक्षणाची व्यवस्था लागू करण्यात आली, ज्याला सर्वोच्च न्यायालयाने ही मंजुरी दिली.



ओबीसी आयोगाला संवैधानिक दर्जा (102वी दुरुस्ती)

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला (**NCBC**) पूर्ण संवैधानिक दर्जा देण्यात आला, ज्यामुळे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या हक्कांना संवैधानिक संरक्षण मिळाले. 105व्या घटनादुरुस्तीद्वारे राज्यांना स्वतःची ओबीसी यादी तयार करण्याचा अधिकारही पुन्हा बहाल करण्यात आला.

सुशासनाचे स्तंभ

योजनांमधून झळकणारी संविधानाची भावना

जन-धन योजना



- जून 2026 पर्यंत **59** कोटींहून अधिक बँक खाती
- ठेवींची रक्कम **3** लाख कोटी रुपयांच्या पार.
- आतापर्यंत सुमारे एकूण **54** लाख कोटी रुपये हस्तांतरित.

आयुष्मान भारत



- **47** कोटी+ लाभार्थी नोंदणीकृत
- **33,000+** सूचीबद्ध रुग्णालये.
- **70+** वयोगटासाठी 93 लाख+ आयुष्मान वय वंदना कार्ड जारी.

जल जीवन मिशन



- सुरुवातीला केवळ **17%** ग्रामीण रांमध्ये नळजोडणी
- 15 ऑक्टोबर, 2026 पर्यंत **82.56%** (15.98 कोटी कुटुंबे) कुटुंबांना योजनेचा लाभ
- आता 2028 पर्यंत मुदतवाढ (जल जीवन मिशन- 2.0)

पीएम आवास योजना

प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण
Pradhan Mantri Awaas Yojana-Gramin

- शहरी भागात **1.25+** कोटी घरे मंजूर (ऑगस्ट 2026)
- ग्रामीण भागात मंजूर **3.91** कोटी घरांपैकी 3.12 कोटी पूर्ण
- 2029 पर्यंत **4.95** कोटींचे उद्दिष्ट

पीएम किसान सन्मान निधी



- 24वा हप्ता (ऑक्टोबर 2026)पर्यंत एकूण **4.65** लाख कोटी रुपये.
- **9.44** कोटी शेतकरी कुटुंबे लाभान्वित

नारी शक्ति वंदन अधिनियम

- संसद-विधानसभांमधे महिलांना **33%** आरक्षण

जीएसटी सुधारणा 2025



- दोन प्रमुख स्लॅब (5% व 18%) मध्ये सुलभीकरण
- **1.65** कोटी+ नोंदणीकृत करदाते.
- 2025-26 मध्ये **22.27** लाख कोटी रुपये कर संकलन

शेवटच्या घटकापर्यंत विकासाची हमी

संविधानाचे मुख्य शिल्पकार डॉ. आंबेडकर यांनी अशा भारताचे स्वप्न पाहिले होते, जिथे सर्वांना समान संधी देऊन सामाजिक न्याय प्रस्थापित होईल. गेल्या वर्षांत केंद्र सरकारने 'वंचितांना प्राधान्य' या तत्त्वाचा अवलंब करत, ज्यांना दशकानुदशके योजनांचा लाभ मिळाला नव्हता, अशा लोकांपर्यंत स्वतः पोहोचण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम आकडेवारीतूनही दिसतो आहे. विविध अभ्यासांनुसार गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांमुळे देशातील 25 कोटींहून अधिक लोक बहुआयामी दारिद्र्यरेषेबाहेर आले आहेत.

लोककल्याणाचा हा प्रवास, योजनांच्या एका संपूर्ण मालिकेत झळकतो. प्रत्येक योजनेची ताजी आकडेवारी या प्रवासाची गती आणि प्रगती सांगणारी आहे. प्रधानमंत्री जन-धन योजनेअंतर्गत आतापर्यंत सुमारे 59 कोटींहून अधिक बँक खाती उघडण्यात आली असून त्यातील ठेवी 3 लाख कोटी रुपयांच्या पार गेल्या आहेत. जन-धन खाते, आधार आणि मोबाइल या त्रिशक्तीचा वापर करून डीबीटीमार्फत 320 हून अधिक योजनांअंतर्गत एकूण सुमारे 53.80 लाख कोटी रुपये 15 ऑक्टोबर 2026 पर्यंत थेट लाभार्थी नागरिकांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. यामुळे 5 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम चुकीच्या हातात जाण्यापासून वाचली आहे. मध्यस्थ संपले आहेत.

“एखादा लोकप्रतिनिधी, जो सेवेला पवित्र कर्तव्य मानतो, जनतेच्या कल्याणासाठी अथक परिश्रम करतो, सुशासनाच्या माध्यमातून त्यांची सुरक्षा आणि समृद्धी सुनिश्चित करतो आणि विनम्रता, आत्म-शिस्त व विकासाप्रती कटिबद्धतेसह समाजाच्या प्रगतीच्या दिशेने समर्पित राहतो, तोच खऱ्या अर्थाने जनतेचा विश्वास, सन्मान, मान्यता आणि समृद्धी मिळवतो.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आता 47 कोटींहून अधिक लोकांची नोंदणी झाली आहे, देशभरातील 33,000 हून अधिक रुग्णालये (17,685 सरकारी आणि 15,380 खासगी) या योजनेशी जोडलेली आहेत. 70 वर्षांवरील 93 लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांना स्वतंत्रपणे आयुष्मान वय वंदना कार्ड जारी करण्यात आले आहे. जल जीवन मिशनअंतर्गत 15 ऑक्टोबर 2026 पर्यंत देशातील 19.35 कोटींहून अधिक ग्रामीण कुटुंबांपैकी सुमारे 15.98 कोटी (82.56 टक्के) कुटुंबांपर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचले आहे. 2019 मध्ये मिशन सुरू झाले तेव्हा जेमतेम 17 टक्के घरांमध्येच ही सुविधा होती. योजनेचे शंभर टक्के उद्दिष्ट गाठण्यासाठी मार्च 2026 मध्ये मंत्रिमंडळाने जल जीवन मिशनच्या दुसऱ्या टप्प्याला (2.0) मंजुरी देऊन त्याला 2028 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजना-शहरीअंतर्गत ऑगस्ट 2026 पर्यंत 1.25 कोटी घरे मंजूर झाली आहेत, तर ग्रामीण योजनेच्या पहिल्या दोन टप्प्यांत मंजूर 3.91 कोटी घरांपैकी 3.12 कोटी घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तर, 2029 पर्यंत 4.95 कोटी घरांच्या उद्दिष्टाच्या दिशेने वेगाने काम सुरू आहे. पीएम किसान सन्मान निधीचा 24वा हप्ता, ऑक्टोबर 2026 मध्ये जारी झाल्यानंतर या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण 4.65 लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम 9.44 कोटी शेतकरी कुटुंबांपर्यंत (ज्यात 2.18 कोटींहून अधिक महिलांचा समावेश आहे) थेट पोहोचली आहे. संसद आणि विधानसभांमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण देणारा नारी शक्ती वंदन अधिनियम मंजूर होऊन देशाच्या मातृशक्तीचा सन्मान करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल पडले आहे.

उपेक्षित इतिहासाची पुनर्स्थापना



सेंगोल
नव्या संसद भवनातील लोकसभा सभागृहात प्रतिष्ठापित, सत्ता-हस्तांतरणाचे आणि कर्तव्य-पथाचे प्राचीन प्रतीक.

- **संविधान हत्या दिन (25 जून):** आणीबाणीच्या गैरवापराच्या स्मरणार्थ.
- **फाळणी वेदना स्मृती दिन (14 ऑगस्ट)** फाळणीतील पीडितांना आदरांजली.
- **आर्थिकदृष्ट्या गरिबांना आरक्षण:** संविधानाच्या 103 व्या दुरुस्तीद्वारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गांना 10% आरक्षण.

श्रीराम मंदिर: 22 जानेवारी 2024 रोजी अयोध्येत रामलल्लाची प्राण-प्रतिष्ठा.



पद्म पुरस्कार: “जन-पद्म” च्या रूपाने सामान्य नागरिकांच्या कर्तृत्वाचा सन्मान.



12वा संविधान दिवस विशेष

मुखपृष्ठ कथा

एक राष्ट्र, एक निवडणूक

- 2 सप्टेंबर 2023 रोजी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन.
- 1951-1967 दरम्यान देशात एकाचवेळी निवडणुका होत असत.
- समितीचा अहवाल 2024 मध्ये प्रसिद्ध; केंद्रीय मंत्रिमंडळाने संविधान (129वी दुरुस्ती) विधेयक, 2024 आणि केंद्रशासित प्रदेश कायदा दुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली
- **सद्यस्थिती:** दोन्ही विधेयके खासदार पी.पी. चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील 41 सदस्यीय संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) विचाराधीन; अहवाल हिवाळी अधिवेशन 2026 पर्यंत अपेक्षित.
- जेपीसीच्या अंदाजानुसार संभाव्य बचत 7 लाख कोटी रुपये आणि जीडीपीमध्ये 1.6% पर्यंत वाढ.
- सर्व निवडणुकांसाठी एकसमान मतदार यादीचा प्रस्ताव.

प्रस्तावित मॉडेल: पहिल्या टप्प्यात लोकसभा-विधानसभा निवडणुका एकाचवेळी, दुसऱ्या टप्प्यात 100 दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका.



“आम्ही संविधानात अंतर्भूत तत्त्वे बळकट करण्यासाठी आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी एकजुटीने काम करण्याच्या आमच्या कटिबद्धतेचा पुनरुच्चारही करतो. आपण प्रगतीची नवी शिखरे गाठू आणि गरीब व वंचितांची स्वप्ने पूर्ण करू.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

आर्थिक लोकशाही: प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचले संविधानाचे न्याय-तत्त्व

संविधानातील समतेचे तत्त्व केवळ सामाजिक क्षेत्रापुरते मर्यादित नाही, तर ते आर्थिक जीवनातही उतरले आहे. सप्टेंबर 2025 मध्ये लागू झालेल्या अत्याधुनिक जीएसटी सुधारणांमुळे, कररचना केवळ दोन प्रमुख श्रेणींमध्ये – 5 टक्के आणि 18 टक्के – सुलभ केली. साबण, टूथपेस्ट आणि ब्रेडसारख्या रोजच्या वापरातील वस्तूंवरील कर घटवून 5 टक्के किंवा शून्य करण्यात आला, जीवनरक्षक औषधांवरील कर घटवून शून्य किंवा 5 टक्के करण्यात आला. शेती अवजारांवर – ट्रॅक्टर, हार्वेस्टर, रोटावेटर – यांवरही दर 5 टक्के करण्यात आले, ज्याला केंद्रीय कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांसाठी वरदान म्हटले. हस्तकलेवरील जीएसटी 12 वरून घटवून 5 टक्के करण्यात आला, ज्यामुळे मूर्ती, पेंटिंग, कलाकुसरीचे काम आणि हस्तव्यावसायिक कारागिरांना मोठा दिलासा मिळाला आहे. खेळणी आणि क्रीडा साहित्यावरील दरही 12 वरून घटवून 5 टक्के करण्यात आला, ज्यामुळे लहान मुलांच्या विकासाशी निगडित एमएसएमई उत्पादनक्षेत्राला बळ मिळाले. या सुधारणांचा थेट लाभ, देशातील 1.65 कोटींहून अधिक जीएसटी-नोंदणीकृत करदात्यांपर्यंत पोहोचला आहे, तर 2017 मध्ये ही संख्या केवळ 66.5 लाख होती. कर संकलनही सातत्याने नवी उंची गाठत आहे. 2021-22 मधील सुमारे 13.76 लाख कोटी रुपयांवरून वाढून 2025-26 मध्ये ते सुमारे 22.27 लाख कोटी रुपयांवर पोहोचले. ही गती 2026-27 मध्येही कायम आहे; एप्रिल-मे 2026 मध्येच जीएसटी संकलन सुमारे 4.37 लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. यावरून दिसते की बहुतांश व्यवसाय औपचारिक

करव्यवस्थेशी कसे जोडले जात आहेत आणि सुलभ कररचना महसूलवाढीलाही कशी हातभार लावत आहे.

आत्मनिर्भरता आणि स्वदेशीची हीच भावना 'व्होकल फॉर लोकल' च्या रूपाने लोकचळवळच बनली आहे. पंतप्रधानांनी आपल्या पहिल्याच 'मन की बात' कार्यक्रमापासून स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्याचे जे आवाहन केले होते, त्याचे स्पष्ट परिणाम आज खेळणी उद्योगासारख्या क्षेत्रांत दिसत आहेत. भारताने 2025-26 मध्ये प्रमुख खेळणी श्रेणींमध्ये 152 दशलक्ष डॉलरचा व्यापार नफा मिळवला आहे. 2017-18 मध्ये हा व्यवसाय तुटीत होता. एक जिल्हा एक उत्पादन (ओडीओपी) योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्याची विशिष्ट ओळख, बाजारपेठेपर्यंत पोहोचवण्याच्या प्रयत्नांशी संबंधित उपक्रमाचे मूल्य 1.71 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. मार्जिन मनी (नफा) योजनेअंतर्गत 6,000 कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर झाले आहेत, तर सव्वा कोटींहून अधिक ओडीओपी कारागिरांना प्रशिक्षण देऊन त्यांना आधुनिक टूलकिटही उपलब्ध करून देण्यात आले आहे. हस्तकला क्षेत्रात राष्ट्रीय हस्तकला विकास कार्यक्रमांतर्गत 837 कोटी रुपयांच्या मंजूर निधीतून 2,325 प्रकल्प आणि कार्यक्रम मंजूर झाले, ज्यांचा थेट लाभ 66,000 हून अधिक कारागिरांना मिळाला. हातमाग क्षेत्र देशभरात 35 लाखांहून अधिक लोकांना रोजगार देते. त्यात 70 टक्क्यांहून अधिक महिला आहेत. प्रत्येक हाताला सन्मानजनक काम आणि प्रत्येक कारागिराला त्याच्या कलेचे योग्य मोल मिळावे, अशी भावना संविधानातून व्यक्त झाली आहे, ही सगळे निर्णय आणि त्यांची अंमलबजावणी, यातून हीच भावना प्रतिबिंबित होत आहे.

संरक्षण उत्पादनातही स्वदेशीकरणाची हीच गाथा पुन्हा दिसते. 2013-14 मध्ये 686 कोटी रुपये असलेली संरक्षण निर्यात, वाढून 2025-26 मध्ये 38,424 कोटी रुपयांवर पोहोचली, म्हणजेच 56 पटींनी वाढ ! पाच सकारात्मक स्वदेशीकरण याद्यांद्वारे 5,500 हून अधिक संरक्षण वस्तू निश्चित करण्यात आल्या, त्यापैकी 3,000 हून अधिकांचे स्वदेशीकरण फेब्रुवारी 2025 पर्यंत झाले होते आणि एलसीए तेजस, अर्जुन टँक, आर्टिलरी गन्स, असॉल्ट रायफल, कॉर्व्हेट, सोनार प्रणाली, हलकी लढाऊ हेलिकॉप्टर आणि स्वदेशी रडार यांसारख्या प्रणाली आज भारताच्या सामरिक आत्मनिर्भरतेची ओळख बनल्या आहेत. उत्पादन-संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजनेअंतर्गत मार्च 2026 पर्यंत 2.40 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित झाली आहे. 15.2 लाख कोटी रुपयांहून अधिक निर्यात शक्य झाली आहे. एवढेच नव्हे, तर 14 लाखांहून अधिक प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती झाली आहे. यावरून दिसते की, संविधानाने कल्पिलेल्या समान आर्थिक संधी आता धोरण आणि अंमलबजावणी या दोन्ही पातळ्यांवर प्रत्यक्षात उतरत आहेत.

संविधान दिन (2025-26) चे विशेष योगायोग



- सरदार वल्लभभाई पटेल यांची 150वी जयंती.



- भगवान बिरसा मुंडा यांची 150वी जयंती.



- गुरु तेग बहादुर जी यांची 350वी शहादत वर्षपूर्ती.
- आणीबाणीची 50 वर्षे (25 जून 1975-2025)
- वंदे मातरमची 150वी वर्षपूर्ती.
- संविधान स्वीकारल्याची 75-77 वर्षे (2024-2026)



आपले संविधान, मानवी प्रतिष्ठा, समानता आणि स्वातंत्र्याला सर्वोच्च महत्त्व देते. त्याने आपल्याला मूलभूत अधिकार देऊन सक्षम तर केले आहेच; शिवाय नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांचीही आठवण करून दिली आहे, जी कर्तव्ये आपण सदैव पार पाडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही कर्तव्येच मजबूत लोकशाहीचा पाया आहेत. चला, आपल्या कृतींच्या माध्यमातून संवैधानिक मूल्ये बळकट करण्याच्या आपल्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार करूया.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

लोकशाहीची जननी: जागतिक मंचावर भारताचा प्राचीन वारसा

भारत केवळ जगातील सर्वात मोठी लोकशाही नाही, तर लोकशाहीची जननीही आहे. भारतातील पाच हजार वर्षे जुन्या वेदांमध्ये सभा आणि समित्यांचा उल्लेख आढळतो, महाभारतासारख्या ग्रंथांत गण आणि गणराज्यांच्या व्यवस्थेचा उल्लेख आहे आणि डॉ. आंबेडकरांनी स्वतः बौद्ध भिक्षु संघाची तुलना भारतीय संसदेशी करताना त्यात प्रस्ताव, गणसंख्या (कोरम) आणि मतदान यांसारख्या नियमांचा उल्लेख केला होता. पंतप्रधान मोदी यांनी आंतरराष्ट्रीय मंचांवर वारंवार अधोरेखित केले आहे की, लोकशाही भारतासाठी केवळ एक व्यवस्था नाही, तर एक संस्कार, एक विचार आणि एक परंपरा आहे.

आज जेव्हा भारताची अर्थव्यवस्था वेगाने विकसित होत आहे आणि त्याची आंतरराष्ट्रीय प्रतिमा बळकट होत आहे, तेव्हा संपूर्ण जग त्याच्याकडे आशेने पाहत आहे. ज्या देशाच्या स्थैर्याबद्दल कधीकाळी शंका व्यक्त केल्या जात होत्या, तो देश आज आपल्या विविधतेचा अभिमान बाळगत पूर्ण शक्तीने पुढे जात आहे. नव्या संसद भवनात स्थापन करण्यात आलेला पवित्र सेंगोल याच सांस्कृतिक सातत्याचे प्रतीक आहे. महान चोल साम्राज्यात सत्ता-हस्तांतरण आणि कर्तव्य-पथाचे प्रतीक राहिलेला सेंगोल आज प्रत्येक अधिवेशनाच्या प्रारंभी राष्ट्रपतींच्या अभिभाषणापूर्वी संसद भवनात प्रतिष्ठापित होऊन भारताच्या त्या संवैधानिक शक्तीची आठवण करून देतो, जी वसाहतवादी काळातून बाहेर पडताना स्वीकारली गेली होती.

निवडणूक सुधारणा: एक राष्ट्र, एक निवडणुकीच्या दिशेने पाऊल

वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे विकासाच्या गतीत येणारे अडथळे दूर करण्यासाठी, केंद्र सरकारने 'एक देश, एक निवडणूक' या दिशेने ठोस पावले उचलली आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या उच्चस्तरीय समितीने, विविध हिसबंधियांशी व्यापक चर्चा आणि सल्लामसलत केल्यानंतर 2024 मध्ये आपला अहवाल सादर केला, ज्याच्या आधारे केंद्रीय मंत्रिमंडळाने संविधान (129वी दुरुस्ती) विधेयक, 2024 आणि केंद्रशासित प्रदेश कायदा (दुरुस्ती) विधेयक, 2024 संसदेत सादर करण्यास मंजुरी दिली. दोन्ही विधेयके सध्या खासदार पी.पी. चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील 41 सदस्यीय संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) विचाराधीन आहेत, ज्या समितीने देशभरातील हितसंबंधियांशी व्यापक सल्लामसलत केली आहे. समितीला अहवाल सादर करण्यासाठी संसदेच्या हिवाळी अधिवेशन 2026 पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. समितीच्या अंदाजानुसार, एकाच वेळी निवडणुका घेतल्याने कालांतराने सुमारे 7 लाख कोटी रुपयांची बचत होऊ शकते आणि भारताच्या जीडीपीमध्ये 1.6 टक्क्यांपर्यंत वाढ शक्य आहे. प्रस्तावित व्यवस्थेत पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेणे आणि दुसऱ्या टप्प्यात शंभर दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे प्रस्तावित आहे, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला लागणारा वेळ, संसाधने आणि प्रशासनावर पडणारा भार, यात मोठी घट होण्याची अपेक्षा आहे.

अधिकार आणि कर्तव्यांचे अतूट नाते

महात्मा गांधी यांनी म्हटले होते, की सर्व अधिकार हे नागरिकांनी खऱ्या निष्ठेने पार पाडलेल्या कर्तव्यांतूनच येतात. गेल्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकांत जेव्हा संपूर्ण जग केवळ अधिकारांबद्दल बोलत होते, तेव्हा गांधीजींनी एक पाऊल पुढे जाऊन नागरिकांच्या कर्तव्यांवर भर दिला होता. पंतप्रधान मोदी यांनी वारंवार हा विचार पुढे नेला आहे की, संविधानात



जितके महत्त्व अधिकारांना आहे, तितकेच महत्त्व कर्तव्यांच्या पालनाच्या अपेक्षेलाही आहे. संविधान दिनानिमित्त होणाऱ्या सामूहिक उद्देशिका-वाचनाचा उद्देशही हाच आहे की, प्रत्येक नागरिकाने, विशेषतः नव्या पिढीने, विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी नागरी कर्तव्यांना प्राधान्य द्यावे.

ही भावना केवळ भाषणांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर धोरणनिर्मितीतही प्रतिबिंबित होत आहे. आय-गॉट (i-got) कर्मयोगी प्लॅटफॉर्मद्वारे सरकारी कर्मचाऱ्यांना कार्यक्षमता आणि उत्तरदायित्वाच्या नव्या संस्कृतीशी जोडण्यात आले आहे, तर स्वच्छ भारत मिशनअंतर्गत सुमारे 12 कोटी शौचालयांच्या निर्मितीने नागरी कर्तव्याला स्वच्छतेच्या व्यावहारिक संकल्पात रूपांतरित केले. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाद्वारे विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांची संस्कृती, भाषा आणि परंपरा यांची परस्पर समज वाढवून भारताची एकता आणि अखंडता अधिक सुदृढ केली जात आहे, जे संविधानाच्या उद्देशिकेत अंतर्भूत असलेल्या 'राष्ट्राची एकता आणि अखंडता' या आदर्शाचाच विस्तार आहे.

संविधानवादाची प्राण-प्रतिष्ठा: नव्या पिढीचा संकल्प

गेल्या 12 वर्षांत जगाने भारताची आणि त्याच्या संविधानाची मजबूत बाजू पाहिली आहे. पूर्वी लोकशाहीविषयक जागतिक चर्चेत प्रामुख्याने अथेन्स, अमेरिका, फ्रान्स आणि मॅग्ना कार्टा यांचाच उल्लेख होत असे; प्राचीन भारतीय लोकशाही परंपरा बहुधा दुर्लक्षित राहत. पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या त्याच महान लोकशाही वारशाची प्राण-प्रतिष्ठा केली आहे. संविधानवादाची अशाप्रकारे पुनर्स्थापना केली आहे की आता कोणताही शासक संविधानाशी छेडछाड करण्याची हिंमत करू शकत नाही. संविधान हत्या दिन म्हणून दरवर्षी 25 जून रोजी स्मरण करणे हे याच संकल्पाचे प्रतीक आहे की, आणीबाणीसारख्या घटनेची पुनरावृत्ती देश पुन्हा कधीही स्वीकारणार नाही.

निश्चितच 12वा संविधान दिन हा केवळ एका तारखेचा उत्सव नाही, तर त्या सामूहिक चेतनेचा उत्सव आहे, ज्यात प्रत्येक नागरिक आपल्या अधिकारांबरोबरच आपली कर्तव्येही तितक्याच निष्ठेने पार पाडतो. संविधान सभेच्या सदस्यांनी 2 वर्षे 11 महिने 18 दिवसांच्या अथक परिश्रमातून हा महान दस्तऐवज आपल्या हाती सोपवला, तेव्हा त्यांचे स्वप्न होते की येणाऱ्या प्रत्येक पिढीने तो जगावा, समजून घ्यावा आणि त्यातून शिकावे. आज जेव्हा देश विकसित भारताच्या संकल्पासह पुढे वाटचाल करत आहे, तेव्हा 140 कोटी नागरिकांचीही हीच जबाबदारी आहे की त्यांनी सामूहिक संकल्पासह संविधानाच्या प्राण-प्रतिष्ठेचे सारथी बनावे, हाच खऱ्या अर्थाने संविधान दिन साजरा करण्याचा उद्देश आहे. ■



दिल्लीतील विजयादशमी सोहळ्यात सहभागी झाले पंतप्रधान नरेंद्र मोदी

पूर्णत्वास येईल 'रामापासून राष्ट्रापर्यंत' आणि 'देवापासून देशापर्यंत' ही संकल्पना

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर साजऱ्या होणाऱ्या रामलीलांमधून देशाची एकता, सामाजिक सलोखा आणि भगवान श्रीरामांच्या आदर्शांचा संदेश दिला जातो. 20 ऑक्टोबर रोजी दिल्लीतील एका कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या. अयोध्येतील राममंदिरातील प्राणप्रतिष्ठापनेच्या वेळी आपण घेतलेला 'रामापासून राष्ट्रापर्यंत' आणि 'देवापासून देशापर्यंत' हा संकल्प आपण सर्वजण मिळून निश्चितच पूर्ण करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला...

हजारो वर्षांपासून आपले पूर्वज प्रभू श्रीरामांची उपासना करत आले आहेत. प्रभू श्रीरामांनी रावणाचा वध करून अधर्मावर धर्माचा विजय मिळवला म्हणून तर ही श्रद्धा आहेच, पण त्यांनी मानवी इतिहासात अतुलनीय असे आदर्श निर्माण केल्यामुळे ती अधिक दृढ झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, प्रभू श्रीरामांनी आपल्या जीवनात अनेक संकटांचा सामना केला; मात्र सत्य आणि नीतीचा मार्ग कधीही सोडला नाही. त्यांच्या चेहऱ्यावर राज्यपद मिळाल्याचा आनंद नव्हता आणि वनवासाला जावे लागल्याचे दुःखही नव्हते. प्रत्येक संकटाला धैर्याने सामोरे जात त्यांनी धर्माचे पालन केले आणि सत्याची स्थापना केली.

स्वतःची क्षमता ओळखून, उपलब्ध साधनसामुग्रीवर ठेवायचा आहे विश्वास

प्रभू श्रीरामांच्या आयुष्यातून मोठा बोध मिळतो की, संकट कितीही मोठे असो, आव्हान कितीही कठीण असो, इतरांच्या भरवशावर विसंबून बसू नये. स्वतःचे सामर्थ्य ओळखायचे आहे, स्वतःच्या साधनसामुग्रीवर विश्वास ठेवायचा आहे, आपल्या संकल्पाला शक्ती बनवायचे





“देशभरात रामलीलांचे प्रयोग सादर करून प्रभू श्रीरामांचे आदर्श जिवंत ठेवण्याची परंपरा आजही जपली जात आहे. अत्याचार आणि दहशतीचा अंत होतो, असत्यावर सनातन सत्याचा विजय होतो, हा विश्वास या परंपरेतून दृढ होतो. त्यामुळे विजयादशमी हा केवळ सण नसून, भारताची चैतन्यशक्ती आणि सांस्कृतिक आत्मा आहे.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

यशाचे मूळ मंत्र

- स्वतःच्या शक्तीवर विश्वास.
- स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव.
- उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर.
- ध्येयप्राप्तीचा अढळ संकल्प.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.

आहे आणि आपल्या परिश्रमांनी मार्ग काढायचा आहे. मार्गातील अडचणींमुळे प्रवास थांबत नाही, हे प्रभू श्रीरामांनी आपल्याला शिकवले आहे. त्यांनी जनतेची सामूहिक शक्ती जागृत केली, लोकसहभागातून आपले सामर्थ्य वाढवले आणि उपलब्ध साधनसंपत्ती एकत्र करून अशक्य वाटणारे ध्येयही साध्य केले. आज आपल्यासमोर विकसित भारत आणि आत्मनिर्भर-स्वावलंबी भारत घडवण्याचे ध्येय आहे. लोकशक्तीच्या बळावर लोककल्याण साधायचे आहे, जनतेच्या आकांक्षा पूर्ण करायच्या आहेत. या ध्येयपूर्तीसाठीही आपल्याला भगवान श्रीरामांकडूनच प्रेरणा घ्यायची आहे.

गरीब आणि वंचितांची सेवा यांना सर्वोच्च प्राधान्य

जब प्रभू श्रीराम वनवासात असताना त्यांनी निषादराजांना प्रेमाने आलिंगन दिले आणि शबरी मातेचा सन्मान केला. त्यातून त्यांनी दया, करुणा, प्रेम आणि सौहार्दाचे आदर्श घालून दिले. वनवासातून अयोध्येत परतल्यानंतर राजा म्हणून त्यांनी रामराज्याची स्थापना केली. आजही रामराज्य हे सुशासनाचे (उत्तम राज्यकारभाराचे) आदर्श उदाहरण मानले जाते. रामराज्य म्हणजे असे शासन, जिथे कोणताही भेदभाव नसतो, प्रत्येकाला न्याय मिळतो आणि सर्वांना समान संधी उपलब्ध होते. जनतेला जनार्दन मानून ‘नागरिक देवो भव’ या मंत्रानुसार वाटचाल करणे आवश्यक आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

विजयाचा सण आहे विजयादशमी

विजयादशमी हा विजयाचा उत्सव आहे. शत्रू कितीही बलाढ्य असला, तरी सत्य आणि मानवतेची साथ असेल, तर अंतिम विजय सत्याचाच होतो, हा विश्वास आणि धैर्य हा सण आपल्याला देतो. विजयादशमीची हीच प्रेरणा आणि भावना भारतीय विचारपरंपरेचा अविभाज्य भाग राहिली आहे.

देशहितासाठी सर्वांनी यावे एकत्र

देशाच्या शत्रूंविरुद्ध सर्वांनी एकजुटीने लढणे आवश्यक आहे. देशाच्या मान-सन्मानाला धक्का पोहोचवणाऱ्या शक्ती, समाजात फूट पाडणारे घटक आणि भारतीय संस्कृतीचा द्वेष करणारी मानसिकता ही देशासमोरील आव्हाने आहेत. आपला संकल्प पुन्हा दृढ करून भारतमातेच्या शत्रूंना ओळखले पाहिजे आणि त्यांचा पराभव केला पाहिजे. ‘राष्ट्र प्रथम’ हा संकल्प घेऊन सर्वांनी एकजुटीने पुढे यावे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले. ■

केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

पंतप्रधान विकसित ग्राम स्वराज

आणि कंटेनर उत्पादन प्रोत्साहन योजनेला मंजुरी

ग्रामीण भागाचा विकास आणि पंचायतींचे सक्षमीकरण करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. याच दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत सरकारने 'पंतप्रधान विकसित ग्राम स्वराज योजना' मंजूर केली आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील शासन व्यवस्था अधिक आधुनिक, सक्षम आणि लोकाभिमुख होण्यास मदत होईल. याशिवाय, कंटेनर उत्पादनाला प्रोत्साहन देणारी योजना, 'खेलो इंडिया' क्रीडा साहित्य उत्पादन योजना, तसेच केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी अनुक्रमे महागाई भत्ता आणि महागाई सवलतीच्या प्रस्तावांनाही मंजुरी देण्यात आली आहे...

निर्णय : ही केंद्र पुरस्कृत योजना 'विकसित भारत'च्या राष्ट्रीय संकल्पनेला अनुसरून ग्रामीण शासन व्यवस्थेला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

परिणाम : केंद्र प्रायोजित यह योजना विकसित भारत के राष्ट्रीय विजन के अनुरूप ग्रामीण शासन व्यवस्था को नई दिशा देने की पहल है।

- या योजनेचा, 2.55 लाखांहून अधिक पंचायतींना लाभ होणार आहे. तसेच, पारंपरिक स्थानिक स्वराज्य संस्थांचे (ग्राम स्वराज्य संस्था) सुमारे 32 लाख निवडून आलेले प्रतिनिधी, पंचायत पदाधिकारी आणि इतर संबंधित घटकांनाही या योजनेचा थेट फायदा मिळणार आहे.
- ही योजना पंचायतींची प्रशासकीय आणि आर्थिक क्षमता वाढवण्यास मदत करेल. त्यामुळे पंचायतींना वित्त आयोगाकडून मिळणाऱ्या अनुदानासह इतर निधीचाही प्रभावी वापर करता येईल. तसेच, स्वतःच्या उत्पन्नाच्या स्रोतांमधून महसूल उभारता येईल. याशिवाय, ऑनलाइन लेखा व्यवस्थापन, लेखापरीक्षण आणि आर्थिक व्यवहारांची सार्वजनिक माहिती उपलब्ध करून देण्याची व्यवस्था अधिक सक्षम होईल.
- या योजनेमुळे उपलब्ध साधनसंपत्तीचा पारदर्शक वापर सुनिश्चित होईल. स्थानिक विकासातील उणिवा दूर करण्यास मदत होईल. तसेच, अधिक जबाबदार आणि आत्मनिर्भर-स्वावलंबी पंचायतींच्या निर्मितीला चालना मिळेल.
- सरकारी योजना आणि राष्ट्रीय उपक्रमांची माहिती नागरिकांना व्हावी, यासाठी जनजागृती कार्यक्रमांच्या माध्यमातून किमान 1 कोटी नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.
- या योजनेचा एकूण खर्च 7,395.55 कोटी रुपये आहे.





आमच्या सरकारने 'प्रधानमंत्री विकसित ग्राम स्वराज योजने'ला मंजुरी दिली आहे. या योजनेमुळे स्थानिक साधनसंपत्ती, उपलब्ध क्षमता आणि स्थानिक आव्हाने लक्षात घेऊन विकासाचे नियोजन करता येईल. या निर्णयामुळे लोकसहभागाला अधिक बळ मिळेल आणि शाश्वत विकासाची उद्दिष्टे वेगाने साध्य करण्यास मदत होईल. **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

निर्णय : केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात आणि निवृत्तीवेतनधारकांच्या महागाई सवलतीत वाढ करण्यास मंजुरी.

परिणाम : हा निर्णय 1 जुलै, 2026 पासून प्रभावी होईल. यामुळे केंद्र सरकारच्या सुमारे 48.54 लाख कर्मचाऱ्यांना आणि 68.71 लाख निवृत्तीवेतनधारकांना लाभ मिळेल.

- यात मूळ वेतन किंवा निवृत्तीवेतनाच्या सध्याच्या 60 टक्के दरात 3 टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. महागाईचा वाढता भार काही प्रमाणात कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.
- महागाई भत्ता आणि महागाई सवलतीतील या वाढीमुळे केंद्र सरकारच्या तिजोरीवर दरवर्षी 10,016.10 कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.
- 7 व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार स्वीकारलेल्या सूत्राच्या आधारे ही वाढ करण्यात आली आहे.

निर्णय : जागतिक स्तरावर स्पर्धात्मक क्रीडा साहित्य उत्पादन परिसंस्था विकसित करण्यासाठी 'खेलो इंडिया क्रीडा साहित्य उत्पादन योजने'ला मंजुरी.

परिणाम : या योजनेमुळे क्रीडा साहित्य क्षेत्रातील गुंतवणूक, उत्पादन, नवोन्मेष आणि निर्यातीला प्रोत्साहन मिळेल. तसेच, जागतिक क्रीडा साहित्य बाजारपेठेत भारताचे दर्जात्मक स्थान अधिक मजबूत होण्यास मदत होईल.

- इसका गुंतवणुकीला प्रोत्साहन, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, संशोधन आणि नवोन्मेष, कौशल्य विकास, गुणवत्ता प्रमाणन आणि बाजारपेठेचा विस्तार यासाठी विशेष सहाय्य उपलब्ध करून भारतातील क्रीडा साहित्य उत्पादनाचा पाया अधिक मजबूत करणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.
- या योजनेमुळे जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकणाऱ्या क्रीडा साहित्य उद्योगाच्या विकासाला चालना मिळेल. तसेच, जागतिक पुरवठा साखळीतील भारताचे स्थान अधिक मजबूत होईल.
- या योजनेसाठी 2026 ते 2033-34 या कालावधीत एकूण 1,856.67 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेची घोषणा केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 मध्ये करण्यात आली होती.

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवर पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.

निर्णय : आर्थिक वर्ष 2039-40 पर्यंतच्या कालावधीसाठी 10,000 कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीसह 'कंटेनर उत्पादन प्रोत्साहन योजने'ला मंजुरी देण्यात आली आहे.

परिणाम : या योजनेचा उद्देश भारतात जागतिक दर्जाची आणि स्पर्धात्मक कंटेनर उत्पादन व्यवस्था विकसित करणे, कंटेनरच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि पुरवठा साखळी अधिक सक्षम आणि मजबूत करणे हा आहे.

- या योजनेअंतर्गत नवीन कंटेनर उत्पादन कारखान्यांना प्रोत्साहन दिले जाईल. तसेच, सध्या कार्यरत असलेल्या कंटेनर उत्पादन कारखान्यांचा विस्तार करण्यासही मदत केली जाईल.
- यामुळे देशाची वार्षिक कंटेनर उत्पादन क्षमता सुमारे 10 पटीने वाढून 75 लाख टीईयू (**TEU – Twenty-foot Equivalent Unit**) पर्यंत पोहोचेल.
- दर्जेदार मालवाहू कंटेनरच्या उत्पादनासाठी भारतात आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करू शकणारी उत्पादन व्यवस्था विकसित होईल. तसेच, मालवाहू कंटेनरच्या निर्यातीचे जागतिक केंद्र म्हणून भारताची ओळख निर्माण करण्यास मदत होईल.
- भारताची सागरी वाहतूक आणि मालाची ने-आण तसेच पुरवठा व्यवस्था अधिक सक्षम आणि लवचिक होईल.
- या योजनेमुळे अंदाजे 3,000 प्रत्यक्ष आणि 50,000 हून अधिक अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील. तसेच, कंटेनर उत्पादनासाठी आवश्यक असलेले कॉर्नर कास्टिंग (कंटेनरच्या कोपऱ्यांवरील धातूचे जोडभाग), विशेष प्रकारचे पोलाद, लाकडी चौकटी आणि रंग यांसारख्या पूरक उद्योगांनाही चालना मिळेल.
- या कंटेनर उत्पादन प्रोत्साहन योजनेची घोषणा केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 मध्ये करण्यात आली होती.



पीएम आवास ग्रामीण किंवा घरकुल योजनेची 10 वर्षे



स्थैर्य... संधी... उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया

घराचे बांधकाम म्हणजे प्रत्येक कुटुंबासाठी सुरक्षितता, आनंद आणि प्रतिष्ठेची नवी सुरुवात असते. त्यामुळेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केंद्र सरकार घरबांधणीसाठी आर्थिक मदत तर देतच, त्यासोबत वीज, पाणी, शौचालय आणि गॅस जोडणीची सुविधाही उपलब्ध करून देत आहे. गेल्या दशकात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात झालेला बदल हा केवळ घरांच्या उभारणीपुरता मर्यादित नसून, त्यातून सामान्य कुटुंबांच्या जीवनात प्रतिष्ठा आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत 2029 पर्यंत ठेवण्यात आले आहे 4.95 कोटी घरे बांधण्याचे उद्दिष्ट...

घर म्हणजे केवळ विटा आणि सिमेंटने उभारलेली वास्तू नसते, तर त्याच्याशी आपल्या भावना आणि आकांक्षा जोडलेल्या असतात. घराच्या चार भिंती आपल्याला सुरक्षितता देतातच, शिवाय उज्ज्वल भविष्याची आशा आणि विश्वासही निर्माण करतात. हीच भावना आणि विश्वास लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 20 नोव्हेंबर 2016 रोजी उत्तर प्रदेशातील आग्रा येथून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणचा (पीएमएवाय-जी – PMAY-G – Pradhan Mantri Awaas Yojana-Gramin) शुभारंभ केला. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) अंतर्गत गेल्या दशकात 3.91 कोटी घरांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी 3 ऑगस्ट 2026 पर्यंत 3.12 कोटी घरांचे बांधकाम पूर्ण करून ती लाभार्थ्यांना सुपूर्द करण्यात आली आहेत. सध्या 79 लाख घरांचे बांधकाम सुरू आहे. ग्रामीण भागातील घरे सुरक्षित आणि दर्जेदार असावीत, यासाठी भारत सरकारने सुमारे 4 लाख गवंड्यांना प्रशिक्षण दिले आहे. तसेच, या योजनेअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या एकूण उद्दिष्टांपैकी किमान 60 टक्के उद्दिष्टे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या पात्र लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

महिला सक्षमीकरण

प्रधानमंत्री आवास योजना-शहरी 2.0 (PMAY-U 2.0 – Pradhan Mantri Awas Yojana-Urban 2.0) अंतर्गत केंद्र सरकारच्या आर्थिक सहाय्याने बांधलेली किंवा खरेदी केलेली घरे कुटुंबातील प्रौढ महिला सदस्याच्या नावावर किंवा कुटुंबातील पुरुष प्रमुख आणि त्याच्या पत्नीच्या संयुक्त नावावर असणे बंधनकारक आहे. मात्र, कुटुंबात एकही प्रौढ महिला सदस्य नसल्यास, घर कुटुंबातील पुरुष सदस्याच्या नावावर नोंदवता येते. जुलै 2026 पर्यंत प्रधानमंत्री आवास योजना-शहरी 2.0 (PMAY-U 2.0) अंतर्गत 16.20 लाख घरांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी 12.62 लाख घरे महिलांच्या नावावर मंजूर करण्यात आली आहेत. तसेच, प्रधानमंत्री आवास योजना-शहरी अंतर्गत मंजूर झालेल्या 1.27 कोटींहून अधिक घरांपैकी 1 कोटी घरे महिलांच्या नावावर मंजूर करण्यात आली आहेत.

देश, 'विकसित भारताचे' ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करत

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून ग्रामीण घरबांधणीवर देखरेख



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बांधण्यात येणारे प्रत्येक घर खरोखर बांधले गेले आहे आणि प्रत्येक लाभार्थी पात्र आहे, याची केंद्र सरकार खात्री करत आहे. यासाठी योजनेच्या देखरेख व्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI – Artificial Intelligence) आणि मशीन लर्निंग या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग सुरू करण्यात आला आहे.

- **शिफारस प्रणाली :** कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित प्रणालीवर पाठवलेल्या छायाचित्रांचे विश्लेषण करून घराच्या भिंती, छत, दरवाजे आणि खिडक्या यांची ओळख पटवली जाते. यामुळे प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण झालेल्या घरांचीच अंतिम नोंद केली जाते आणि घराचे बांधकाम पूर्ण झाल्याची खात्री केली जाते.

- **फसवणूक रोखण्यासाठी :** मशीन लर्निंग तंत्रज्ञानातील संगणकीय कार्यपद्धती एकाच परिसरातील घरांच्या छायाचित्रांची परस्परांशी तुलना करतात. छायाचित्रांमध्ये साम्य आढळल्यास, एकाच घराची पुन्हा नोंद होऊ नये किंवा चुकीची माहिती सादर केली जाऊ नये, यासाठी ही प्रणाली सतर्क करते.

- **चेहरा प्रमाणीकरण आणि ई-केवायसी:** लाभार्थ्यांची ओळख आधार क्रमांकाच्या आधारे आणि एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने चेहरा ओळखून पडताळली जाते. 'आवास + 2024' या मोबाइल ॲपमध्ये घराचा त्रिमितीय आराखडा तयार करण्यासारख्या नवीन सुविधांसोबत आधारद्वारे चेहरा ओळखण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे लाभार्थ्यांची ओळख अधिक पारदर्शकपणे पडताळता येते.

"पीएम आवास योजनेअंतर्गत आतापर्यंत कोट्यवधी लाभार्थ्यांना स्वतःचे पक्के घर मिळाले आहे. प्रत्येक गरजू कुटुंबाला हक्काचे घर उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवून सरकार पूर्ण कटिबद्धतेने आणि वेगाने काम करत आहे.

–नरेंद्र मोदी, पंतप्रधान

पीएम आवास योजना - शहरी

देशातील शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी एकूण 1.12 कोटी घरांची मागणी नोंदवण्यात आली आहे. 25 जून 2015 रोजी सुरू झालेल्या प्रधानमंत्री आवास योजना – शहरी 1.0 अंतर्गत 111.48 लाख घरे, तर प्रधानमंत्री आवास योजना – शहरी 2.0 (**PMAY-U** 2.0) अंतर्गत 16.20 लाख घरे मंजूर करण्यात आली आहेत. अशा प्रकारे एकूण 127.68 लाख घरांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी 121.03 लाख घरांचे बांधकाम सुरू झाले आहे. 13 जुलै 2026 पर्यंत देशभरात 99.07 लाख घरांचे बांधकाम पूर्ण झाले असून, ही घरे लाभार्थ्यांना सुपूर्द करण्यात आली आहेत.

आहे. हे ध्येय साध्य करण्यात सक्षम आणि समृद्ध ग्रामीण लोकसंख्येची महत्त्वाची भूमिका असेल. त्यामुळे आगामी वर्षे ग्रामीण भागातील सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीणच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यांत आतापर्यंत 3.12 कोटी घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या योजनेमुळे घर मिळण्याबरोबरच लाखो कुटुंबांना सन्मान, स्वावलंबन आणि विविध सुविधाही मिळाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आला आहे. प्रत्येक पात्र कुटुंबाला स्वतःचे पक्के घर मिळावे, या दिशेने ही योजना महत्त्वपूर्ण ठरत आहे. 2029 पर्यंतचे स्पष्ट नियोजन समोर ठेवून ग्रामीण भारतात 'सर्वांसाठी घरे' हे उद्दिष्ट प्रत्यक्षात आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. ■



आरबीआय - भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डेटा सेंटर आणि सायबर सुरक्षा प्रशिक्षण संस्थेचे उद्घाटन

सुशासनाद्वारे संतुलित विकास

आज भारतात दुर्गम भागांपर्यंत उत्तम पायाभूत सुविधा पोहोचवण्यावर, गरीब कुटुंबांना सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर, तसेच डिजिटल संपर्क व्यवस्था मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. त्याचबरोबर सर्वांना सुरक्षित बँकिंग आणि आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विकासाच्या प्रवासात कोणताही नागरिक मागे पडू नये आणि प्रत्येकाला विकासाच्या संधी मिळाव्यात, यासाठी विविध सेवा आणि सुविधा विकसित केल्या जात आहेत. या सर्व प्रयत्नांबरोबरच भारत आपली आर्थिक व्यवस्था अधिक सुरक्षित आणि सक्षम करत आहे. याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 25 ऑक्टोबर रोजी ओदिशामध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नवनिर्मित डेटा सेंटर आणि सायबर सुरक्षा प्रशिक्षण संस्थेचे केले उद्घाटन...

नागरिकांचे जीवन अधिक सुकर करणे आणि त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी नव्या संधी उपलब्ध करून देणे, हाच सध्याच्या सरकारचा मुख्य उद्देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमात सांगितले की, भारतातील प्रशासनाचा दृष्टिकोन वेगाने बदलत आहे. रिझर्व्ह बँकेच्या (RBI) या नव्या सुविधा भारताच्या बदलत्या प्राधान्यक्रमांचेही प्रतीक आहेत. आज सरकारचे लक्ष विकासाला प्राधान्य देणे, विकासाचा विस्तार करणे आणि विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणे यावर आहे. अनेक दशकांपासून देशाच्या प्रत्येक भागात आणि प्रत्येक नागरिकापर्यंत विकासाचा समान लाभ पोहोचवणे हे एक मोठे आव्हान राहिले आहे. हे चित्र बदलण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. लोकहिताला प्राधान्य देणारा, सक्रिय आणि सुशासनाच्या तत्त्वांवर आधारित प्रशासनाचा नमुना सरकारने स्वीकारला आहे. विकास म्हणजे भारताची न्याय्य आणि सर्वसमावेशक प्रगती. या प्रगतीचा लाभ गावागावांत आणि छोट्या शहरांपर्यंत समानपणे पोहोचला पाहिजे. दुर्गम भागांमध्ये उत्तम संपर्क सुविधा उपलब्ध करून देणे, गरीब कुटुंबांना सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक सुविधा देणे आणि विकासाच्या प्रवासात कोणताही नागरिक मागे राहणार नाही, असा विश्वास प्रत्येकाच्या मनात निर्माण करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.

आता बँकिंग होईल अधिक विश्वसनीय आणि सुरक्षित

भारताने गेल्या दशकात बँकिंग सुविधांपासून वंचित असलेल्या लोकांना या व्यवस्थेशी जोडण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी

विकसित भारताचे सशक्त इंजिन : पूर्व भारत

भुवनेश्वर येथील कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा सांगितले की पूर्व भारत हा विकसित भारताच्या निर्मितीत विकासाचे एक सशक्त इंजिन बनेल. ओडिशामध्ये विद्यमान सरकारच्या नेतृत्वाखाली विकास कामांना नवी गती मिळाली आहे. राज्य आपल्या पारंपरिक खनिज-आधारित उद्योगांसोबतच सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स, डेटा सेंटर आणि प्रगत संगणकीय प्रणालींची नवी परिसंस्था विकसित करत आहे. अशा प्रकारे ओडिशा खाणींपासून मायक्रो-चिपपर्यंतच्या विकास प्रवासातून भविष्यातील मोठ्या संधी निर्माण करत आहे. विकासाची ही उदयोन्मुख क्षेत्रे व्यापक संधींची दारे उघडतील, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला.

पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

मोदी यांनी सांगितले की आगामी दशक ओडिशातील नव्या डेटा सेंटर आणि मजबूत संगणकीय प्रणालींच्या मदतीने बँकिंग सेवा अधिक कार्यक्षम आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी समर्पित असेल. पंतप्रधान मोदी म्हणाले की आजकाल युद्ध केवळ शस्त्रांनी लढली जात नाहीत. एखाद्या देशाला कमकुवत करायचे असेल तर त्याच्या अर्थव्यवस्थेवर हल्ला करूनही हे केले जाऊ शकते. अशा परिस्थितीत भारत आर्थिकदृष्ट्या सशक्त होत असताना सायबर लुटारू आणि सायबर दहशतवाद्यांपासून आपल्या बँकिंग व्यवस्थेचे संरक्षण करणेही अनिवार्य आहे. आज सायबर धोका आणि त्याचे स्वरूप बदलत आहे. अशा नव्या आव्हानांचा सामना जुन्या व्यवस्था, जुन्या प्रशिक्षण पद्धती आणि जुन्या प्रशिक्षण साधनांच्या माध्यमातून करता येणार नाही. यासाठी आधुनिक पायाभूत सुविधांबरोबरच कुशल मनुष्यबळाचीही आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत सायबर सुरक्षा संस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

सरकारी मदतीच्या वितरणातील गळती संपुष्टात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की 2014 सालापर्यंत निम्म्याहून अधिक लोकसंख्या बँकिंग व्यवस्थेच्या बाहेर होती. बँकेकडून कर्ज घेणे, हे मध्यमवर्गीयांसाठी स्वप्नवत होते. लहान शेतकरी, भूमिहीन आणि महिलांसाठी तर कर्ज घेण्याची कल्पना करणेही कठीण होते. वित्तीय समावेशनाच्या आधुनिक पर्वाने देशभरातील ही परिस्थिती बदलली आहे. आज भारतात डिजिटल बँकिंगमुळे प्रत्येकजण 24 तास बँकिंग सेवांशी जोडला गेला आहे. प्रत्येक कुटुंब लाभार्थी बनले आहे. आता सरकारी मदतीच्या वितरणात होणारी कोणत्याही प्रकारची गळती पूर्णपणे संपुष्टात आली आहे. केंद्र सरकार जितका पैसा पाठवते, त्यातील प्रत्येक रुपया आता कोणतीही कपात न होता थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पोहोचतो. देशात उघडण्यात आलेल्या जवळपास 60 कोटी जनधन खात्यांमुळेच हे शक्य झाले आहे. ■




ज्याच्याकडे बँकेला हमी देण्यासाठी काहीही नाही, तोही आज बँकेकडून स्वस्त आणि सुलभ कर्ज घेऊन स्वतःचा एखादा व्यवसाय सुरु करु शकतो. छोट्या उद्योजकांपासून पारंपरिक कारागिरांपर्यंत, रस्त्यावरील फेरीवाल्यांपासून असंघटित क्षेत्रातील कामगारांपर्यंत सर्वांनाच, औपचारिक बँकिंगचा लाभ पहिल्यांदाच मिळाला आहे.

–नरेंद्र मोदी, पंतप्रधान

भारताच्या सामर्थ्याने वाढेल जगाचे सामर्थ्य

'विकसित भारत' हा संकल्प केवळ 140 कोटी देशवासीयांच्या आकांक्षांची पूर्तता करणारा नाही, तर शांततापूर्ण आणि समृद्ध जगाची हमी देणाराही आहे. भारत आता केवळ जगाचे 'बॅक ऑफिस' राहिलेला नाही, तर नवोन्मेष आणि उपाययोजना देणारे 'ब्रेन ऑफिस' बनून संपूर्ण मानवतेला सक्षम करत आहे, असे सांगत एनडीटीव्ही वर्ल्ड समिटमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की बदलत्या जागतिक व्यवस्थेत मजबूत आंतरराष्ट्रीय संस्था आणि ग्लोबल साऊथचा सशक्त आवाज ही आजच्या काळाची गरज आहे...

> *विकसित भारत केवळ आपल्यासाठी नाही. विकसित भारत म्हणजे एका आणखी चांगल्या जगाचीही हमी आहे.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



एनडीटीव्ही वर्ल्ड समिट-2026 मध्ये 22 ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की जागतिक बदलांचा थेट परिणाम आता सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. या बदलांच्या वास्तव जीवनावर होणाऱ्या परिणामातून आंतरराष्ट्रीय मंचांची आवश्यकता लक्षात येते. 'द वर्ल्ड बिटवीन ऑर्डर्स' अर्थात 'अनागोंदी कारभार आणि नव्या व्यवस्थेच्या स्थित्यंतरादरम्यानचे जग' हा विषय चर्चेच्या केंद्रस्थानी ठेवत पंतप्रधान मोदी म्हणाले की सध्याच्या जागतिक व्यवस्थेत बदल का होत आहेत आणि जुन्या व्यवस्था आजच्या संकटांवर उपाय शोधण्यात का अपयशी ठरत आहेत, यावर जागतिक समुदायाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

एकेकाळी देशांना जोडणारे व्यापार, तंत्रज्ञान आणि सागरी मार्ग आता शस्त्र म्हणून वापरले जात आहेत. अशा परिस्थितीत आज अशा सर्वसमावेशक जागतिक व्यवस्थेच्या निर्मितीची गरज आहे, जी संस्थात्मक निर्णयप्रक्रिया आणि सध्याची वास्तविक परिस्थिती यांच्यातील दरी संपवू शकेल. पंतप्रधान मोदी यांनी ठामपणे सांगितले, इथूनच भारताच्या भूमिकेचा प्रश्न प्रामुख्याने पुढे येतो. पंतप्रधान मोदी म्हणाले की "शतक बदलले आणि आपण बदललो नाही, तर बदल घडवून आणण्याची आपली क्षमताही कमकुवत होते." अशा परिस्थितीत उदयाला येत असलेल्या जागतिक व्यवस्थेत बहुपक्षीय संस्थांमध्ये

पंतप्रधानांनी महत्त्वपूर्ण ऐतिहासिक कामगिरीचा उल्लेख केला...

300 गिगावॅट

भारताने प्रथमच जीवाश्मेतर स्रोतांपासून वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेचा आकडा पार केला.



- **25%** वाढ सप्टेंबर महिन्यात वस्तूंच्या निर्यातीत 25% वाढ नोंदवण्यात आली.
- गेल्या 12 वर्षांत सागरी खाद्यपदार्थांच्या निर्यातीत दुपटीपेक्षा जास्त वाढ झाली.
- **3.5** कोटींपेक्षा जास्त लखपती दीदी बनल्या आहेत. ही संख्या 6 कोटी पर्यंत पोहोचवण्याचे लक्ष्य आहे.
- **70** लाख नवीन रोजगार, पीएम विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत निर्माण केले जात आहेत.
- **12** लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर शून्य कर, हा लाभ मध्यमवर्गाला दिला जात आहे.
- संशोधन प्रकाशनांमध्ये भारत तिसऱ्या स्थानावर आहे.
- **1.5** लाख पेटंट अर्ज, 2025 या वर्षात दाखल करण्यात आले.
- **20%** वाटा जागतिक चिप-डिझाइन क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांपैकी भारतीयांचा आहे.
- 2 ते 3 नॅनोमीटरच्या चिप्स डिझाइन करण्यामध्ये भारतीय अभियंते सक्रियपणे गुंतले आहेत.
- **325** पेक्षा जास्त चिप डिझाइन्स देशातील विद्यार्थ्यांनी आतापर्यंत तयार केल्या आहेत.
- जगातील निम्म्यापेक्षा जास्त ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स भारतात आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक उदाहरण देऊन स्पष्ट केले की भविष्यातील संकटांचा सामना करण्याच्या तयारीसाठी आखलेल्या सरकारी धोरणांचा आणि दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दूरदृष्टीचा परिणाम म्हणून औषध उद्योगात बदल झाला आहे. पूर्वी कच्च्या मालासाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असलेला औषध उद्योग आता आत्मनिर्भर होत आहे. यात पीएलआय योजनेची मोठी भूमिका आहे. नवोन्मेषाला प्रोत्साहन देणे, नवे मार्ग शोधणे, आव्हानांचे संधीत रूपांतर करणे आणि भारताच्या यशाला जागतिक समृद्धीशी जोडण्याचा संकल्प पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, "आपण मोठी स्वप्ने पाहू, प्रत्येक आव्हानाचे संधीत रूपांतर करू आणि आपला प्रत्येक संकल्प सिद्धीला नेऊ."



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

सुधारणा आणि ग्लोबल साऊथच्या आवाजाला तातडीने योग्य स्थान दिले पाहिजे.

सामर्थ्यशाली देशांनी दुर्बल देशांचे शोषण करू नये. याच दृष्टिकोनातून भारताने कोविड-19 च्या काळात पुढाकार घेऊन 100 पेक्षा जास्त देशांना लसी आणि औषधे उपलब्ध करून दिली. सबका साथ, सबका विकास या मूलमंत्रानुसार भारताने जी-20 आणि ब्रिक्स शिखर संमेलनांदरम्यान सर्वसहमती घडवून आणली आणि दोन्ही प्रसंगी दिल्ली घोषणापत्र एकमताने मंजूर करून घेण्यात यश मिळवले. भारताच्या वाढत्या शक्तीला जागतिक कल्याणाशी थेट जोडताना पंतप्रधान मोदी म्हणाले की देशाची धोरणे क्षणिक आवेगांऐवजी शाश्वत सभ्यतागत मूल्यांवर आधारित आहेत. त्यामुळे एक सशक्त भारत जागतिक स्थैर्य आणि सातत्याची हमी देतो. ■



विकसित भारताचा आधार... वैज्ञानिक संशोधन आणि नवोन्मेष

'विकसित भारत' या संकल्पाच्या सिद्धीचा पाया वैज्ञानिक संशोधन, मूलभूत शोध आणि नवोन्मेषाच्या भक्कम पायावर अवलंबून आहे. भारताला केवळ नवे शोध स्वीकारायचे नाहीत, तर भविष्यातील तंत्रज्ञानाला दिशा देऊन जगाचे नेतृत्वही करायचे आहे. त्याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या वेगवान तंत्रज्ञानाच्या काळात नवोन्मेषाच्या वेगासोबतच विश्वासार्हता, अचूकता आणि तथ्यांची प्रमाणिकता टिकवून ठेवणेही अनिवार्य आहे. याच पैलूला पुढे नेणाऱ्या 'उभरता विज्ञान, प्रौद्योगिकी और नवाचार सम्मेलन 2026' या परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 27 ऑक्टोबर रोजी केले...

भारतातील युवा ज्या स्तरावर आणि आत्मविश्वासाने पुढे जात आहेत, ते अत्यंत उत्साहवर्धक आहे. पूर्वी भारत परदेशी नवोन्मेष अनेक वर्षांनंतर स्वीकारून किंवा त्यात बदल करून त्यांचे अनुकरण करत असे. आजचा भारत मूलभूत तंत्रज्ञान विकसित करून जगभरातील आव्हानांवर उपाय शोधण्याचे उद्दिष्ट घेऊन आगेकूच करतो आहे. भारतीय शास्त्रज्ञांनी पहिल्याच प्रयत्नात मंगळ ग्रहापर्यंत पोहोचण्यापासून ते चंद्राच्या न शोधलेल्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग करण्यापर्यंतच्या कामगिरीत यश मिळवले आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की भारताने भविष्यातील तंत्रज्ञान स्वीकारले पाहिजे, धाडसाने नवोन्मेषाची कास धरली पाहिजे, आणि हे तंत्रज्ञान निर्माण करण्यात जगाचे नेतृत्व केले पाहिजे.


शून्य आणि संख्या प्रणालीच्या शोधापासून ते खगोलशास्त्रापर्यंत भारताला संशोधनाची समृद्ध परंपरा लाभली आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि नव्या आत्मविश्वासाच्या बळावर देश या वैज्ञानिक वारशाला पुढे नेत आहे. गेल्या एका वर्षातील उल्लेखनीय कामगिरीवरून हे सातत्याने अधोरेखित झाले आहे.

प्रयोगशाळा तंत्रज्ञान

12,000 कोटी रुपये सरकारने प्रयोगशाळा तंत्रज्ञानावर खर्च केले. त्याचबरोबर खासगी गुंतवणूकदारांनीही गेल्या एका वर्षात 12 हजार कोटी रुपये खर्च केले. एका वर्षातच संशोधन आणि विकासासाठी एकूण 24 हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

एका वर्षातील यश...

- **1.5** लाखांपेक्षा जास्त झाली वार्षिक पेटंटची संख्या. 10 वर्षांपूर्वी ती 50,000 पेक्षाही कमी होती.
- स्वदेशी **500**-मेगावॅट प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टरने यशस्वीपणे 'फर्स्ट क्रिटिकलिटी' (पहिल्यांदा अणुसाखळी अभिक्रिया सुरू होण्याची स्थिती) प्राप्त केली आहे.
- भारतीय स्पेस स्टार्टअपने 'मेड-इन-इंडिया' रॉकेटचा वापर करून पहिल्याच प्रयत्नात उपग्रह कक्षेत स्थापित केला. देशाने 'सॅटेलाइट डॉकिंग' (अंतराळात दोन उपग्रह एकमेकांना जोडण्याची) क्षमता प्राप्त केली आहे.
- देशाने 'एआय इम्पॅक्ट समिट'चे आयोजन केले, आपले एआय मॉडेल सादर केले. भारतात तयार झालेल्या सेमीकंडक्टर चिपची जगभर निर्यात सुरू करण्यात आली.



भविष्याला आकार देणारी क्षेत्रे

- सेमीकंडक्टर, क्वांटम तंत्रज्ञान, बायोटेक्नॉलॉजी, ॲडव्हान्स्ड मटेरियल, रोबोटिक्स, अंतराळ, स्वच्छ ऊर्जा, एआय, सिंथेटिक बायोलॉजी आणि ऑटोनॉमस सिस्टिम्स.

पंतप्रधान मोदी यांनी परिषदेत उपस्थित असलेल्या प्रत्येक संशोधकाला, उद्योग जगतातील नेत्याला, स्टार्टअप संस्थापकाला आणि विद्यार्थ्याला तीन वर्षांचे ठोस उद्दिष्ट निश्चित करण्यास सांगितले.




कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्याला लवकर उत्तरे देऊ शकते. मात्र, त्या उत्तरांची सत्यता तपासण्याची जबाबदारी वैज्ञानिकाची असली पाहिजे.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

पंतप्रधान मोदी म्हणाले की विज्ञानाचे खरे यश प्रयोगशाळेच्या बाहेर पडून सामान्य लोकांचे जीवन अधिक चांगले बनवण्यात, मोठ्या समस्या सोडवण्यात आणि आरोग्यसेवा, शेती, शिक्षण, रोजगार तसेच आपत्तींचा सामना करण्याची क्षमता मजबूत करण्यात आहे. भारतीय स्टार्टअप्स या क्षेत्रांना प्राधान्य देत आहेत. त्यांनी अनेक क्षेत्रांत काम करणाऱ्या अशा स्टार्टअप्स आणि देशांतर्गत कंपन्यांची उदाहरणे दिली. त्यात मेंदूच्या हालचाली समजून घेण्यासाठी वापरले जाणारे वेअरेबल ईईजी तंत्रज्ञान, स्वदेशी वायरलेस आणि सॅटेलाइट कम्युनिकेशन, विशेष पोषण उत्पादने, नवे सेमीकंडक्टर तंत्रज्ञान आणि स्टील स्लॅगसारख्या औद्योगिक कचऱ्याचा वापर करणाऱ्या उपाययोजनांचा समावेश होता. ■



यमुना पुनरुज्जीवन प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन समारंभ

2029 सालापर्यंत निर्मळ होईल यमुना

दिल्ली, हरियाणा आणि उत्तर प्रदेशच्या राज्य सरकारांबरोबर केंद्र सरकारने तयार केलेल्या आराखड्याच्या माध्यमातून 2029 सालापर्यंत यमुना निर्मळ केली जाईल. याचाच एक भाग म्हणून 22 ऑक्टोबर रोजी केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी दिल्लीत यमुना पुनरुज्जीवनाशी संबंधित 8,941 कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले...

◆ तप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला अशी दिल्ली निर्माण करायची आहे, जिथे घरे सुंदर असतील, पाणी शुद्ध असेल, गल्ल्या स्वच्छ असतील, कचऱ्याचे डोंगर नसतील आणि निर्मळ यमुना नदी दिल्लीपासून संगमापर्यंत जनतेला आपला आशीर्वाद देऊ शकेल. यामुळेच यमुना पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या लोकार्पण आणि भूमिपूजन समारंभात केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे काम एक अढळ संकल्प म्हणून स्वीकारले आहे. आज या संकल्पाचा एक मोठा भाग पूर्ण होत आहे.

केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितले की आज येथे 10 प्रकल्पांचे लोकार्पण झाले आणि 33 प्रकल्पांचा शुभारंभ झाला आहे.



सजू-सावरू लागलेली दिल्ली

- पंतप्रधान मोदी यांनी दिल्ली सरकारसमोर यमुना नदी प्रदूषणमुक्त करण्याची कृती योजना मांडली. या योजनेचे 40% काम पूर्ण झाले आहे.
- गेल्या सुमारे 30 वर्षांपासून दिल्लीतील सांडपाणी यमुना नदीत सोडले जात होते. तसेच, दररोज डेअरींमधील 2,000 टन शेण यमुनेत टाकले जात होते.
- कचऱ्याच्या डोंगरांच्या नावाखाली राजकारण होत राहिले. सध्याच्या दिल्ली सरकारने कचऱ्याचे हे डोंगर कमी करण्याचे काम केले. 2 वर्षांनंतर या कचऱ्याच्या डोंगरांच्या जागी उद्यान तयार होईल.
- दिल्ली सरकारने केंद्र सरकारच्या मदतीने 2.17 कोटी मेट्रिक टन कचरा साफ करून 100 एकर जमीन कचऱ्यापासून मुक्त केली आहे.
- ओखला आणि भलस्वा इथले कचऱ्याचे डोंगर 30 ते 40 मीटरने कमी झाले आहेत. गाझीपूर इथला कचऱ्याचा डोंगर 10 ते 15 मीटरने कमी झाला आहे.

“आम्ही तीन वर्षांची एक कृती योजना तयार केली आहे. या योजनेअंतर्गत दिल्लीतील प्रत्येक घराला सांडपाणी वाहून नेण्यासाठी जोडणी करून देण्यात येईल. यामुळे सांडपाण्याचा योग्य निचरा होईल. त्याचबरोबर प्रत्येक घरात पिण्यासाठी शुद्ध पाणी पोहोचवण्याचे कामही आम्ही करू

– अमित शाह, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री



त्यांनी सांगितले की, 8,941 कोटी रुपयांच्या एकूण खर्चाने सुरू झालेल्या या प्रकल्पांमुळे लाखो लीटर पाण्यावर प्रक्रिया करून ते स्वच्छ केल्यावर यमुना नदीत सोडले जाईल. दिल्लीतील अनेक भागांशी संबंधित प्रकल्पांचे इथे उद्घाटन करण्यात आले. तसेच, सांडपाणी प्रक्रिया केंद्रे - एसटीपींचे आधुनिकीकरण आणि नवीन एसटीपी उभारण्याच्या कामाचे भूमिपूजनही करण्यात आले आहे. विकेंद्रित एसटीपी पंपिंग स्टेशनही उभारण्यात आले आहे. घरांना सांडपाणी वाहून नेणाऱ्या मुख्य वाहिन्यांशी जोडून घेण्याचे कामही सुरू झाले आहे. मे 2029 पूर्वी यमुना नदीचे पाणी स्वच्छ केले जाईल, असा विश्वास गृह मंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

यमुनेला प्रदूषणमुक्त करण्याच्या संकल्पाला नवी गती

दिल्ली सरकारच्या जलशुद्धीकरण केंद्रांशी, पुनर्वापर प्रकल्पांशी, सांडपाणी प्रक्रिया केंद्रांशी, सांडपाणी पंपिंग स्टेशनशी आणि घरगुती सांडपाणी जोडण्यांशी संबंधित या प्रकल्पांमुळे दररोज लाखो लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते यमुना नदीत सोडले जाईल. यामुळे यमुना नदी प्रदूषणमुक्त करण्याच्या संकल्पाला नवी गती मिळेल. ■


केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.



आंतरराष्ट्रीय सौर आघाडीची 11 वर्षे

सौर ऊर्जेच्या जागतिक विस्ताराचा प्रकाशकिरण

सौर ऊर्जा ही आजच्या काळातील सर्वात मौल्यवान सार्वजनिक संपत्तींपैकी एक म्हणून उदयास आली आहे. सौर ऊर्जेमुळे घडणारे परिवर्तन हे केवळ ऊर्जेपुरते मर्यादित नाही; तर त्याचा प्रभाव त्यापलीकडे जाणारा आहे. याच कारणामुळे सौर ऊर्जेला प्रोत्साहन देण्याच्या मार्गातील अडथळे दूर करण्याच्या उद्देशाने 30 नोव्हेंबर 2015 रोजी भारत आणि फ्रान्स यांनी संयुक्तपणे आंतरराष्ट्रीय सौर आघाडीची स्थापना केली. येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ, हरित आणि अधिक शाश्वत भविष्य घडवण्यासाठी ही संघटना योगदान देत आहे...



> *आंतरराष्ट्रीय सौर आघाडी केवळ भारतातच नव्हे; तर संपूर्ण जगात स्वच्छ ऊर्जेची क्रांती पुढे घेऊन जात आहे. भविष्यात, जेव्हा 21व्या शतकात मानवतेच्या कल्याणासाठी स्थापन झालेल्या संघटनांविषयी चर्चा होईल, तेव्हा आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे नाव त्या यादीत अग्रस्थानी असेल.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

भारत आणि फ्रान्स यांनी जागतिक विकासाच्या केंद्रस्थानी सूर्याची शक्ती प्रस्थापित करण्याच्या महत्त्वाकांक्षी दृष्टीने संयुक्त राष्ट्रांची हवामान बदलविषयक परिषद सीओपी-21दरम्यान आंतरराष्ट्रीय सौर आघाडी - आयएसएची स्थापना केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे या संकल्पनेचे एका जागतिक चळवळीत रूपांतर होण्यास मदत झाली. गेल्या 11 वर्षांमध्ये आंतरराष्ट्रीय सौर आघाडीने सौर ऊर्जेच्या संभाव्यतांना जगभरात प्रत्यक्ष आणि जीवन बदलून टाकणाऱ्या परिणामांमध्ये रूपांतरित करण्यास मदत केली आहे. सौर ऊर्जेची सर्वाधिक गरज जिथे आहे तिथे तिच्या वापराला प्रोत्साहन देऊन जागतिक ऊर्जा परिवर्तनाचा प्रवाह उदयोन्मुख आणि विकसनशील अर्थव्यवस्थांच्या दिशेने वळवण्यात या संघटनेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सौर ऊर्जेला प्रोत्साहन देणे, सौर ऊर्जेने समृद्ध असलेल्या देशांशी अधिक चांगल्या समन्वयातून सौर ऊर्जेची मागणी पूर्ण करणे, सौर ऊर्जा स्वस्त करणे, तसेच, ती विश्वासार्ह आणि व्यापक प्रमाणात उपलब्ध करून देणे, या उद्देशांनी या संघटनेची स्थापना करण्यात आली होती.

आज 130 सदस्य आणि स्वाक्षरीकर्ता देशांसह आंतरराष्ट्रीय सौर

आयएसएचे 4 धोरणात्मक स्तंभ


- **कॅटॅलिटिक फायनान्स हब:** अर्थात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक उपलब्ध करून देण्यासाठी आणि तिला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक उत्प्रेरक केंद्र.
- **जागतिक क्षमता केंद्र आणि डिजिटलीकरण** नवोन्मेष, डिजिटल व्यासपीठ आणि क्षमता बांधणीला प्रोत्साहन देण्यासाठी.
- **प्रादेशिक आणि देशस्तरीय सहभाग** स्थानिक गरजांनुसार तयार केलेल्या उपाययोजना राबवण्यासाठी.
- **तंत्रज्ञानाच्या मार्गाचा नकाशा आणि धोरण:** उदयोन्मुख सौर तंत्रज्ञानाच्या विकासाला गती देण्यासाठी.

~~एक संधि-आधारित अंतर-सरकारी मंच के रूप में, आईएसए अपने सदस्य देशों को सौर ऊर्जा को व्यापक स्तर पर अपनाने में सहायता करने के लिए तकनीकी मार्गदर्शन, नीतिगत नेतृत्व और वैश्विक समन्वय प्रदान करता है।~~

स्वच्छ ऊर्जेच्या उत्पादनात सौर ऊर्जा ही विकासाचे प्रमुख इंजिन बनली आहे. 2014 मध्ये केवळ 2.8 गिगावॅट असलेली सौर ऊर्जा उत्पादनाची क्षमता वाढून सध्या जवळपास 165 गिगावॅट झाली आहे. पवन ऊर्जा उत्पादन क्षमतेतही 2014 मधील 21 गिगावॅटवरुन वाढ होऊन ती 58 गिगावॅटपेक्षा अधिक झाली आहे.

सूर्य, पाणी, वारा आणि अणुपासून वीज

भारत जीवाश्मेतर इंधन म्हणजेच सूर्य, पाणी, वारा आणि अणू यांच्या माध्यमातून वीज निर्मिती करण्याची क्षमता सातत्याने वाढवत आहे. 31 जुलै 2026 पर्यंत या उत्पादन क्षमतेने 300 गिगावॅटचा टप्पा ओलांडून मागे टाकला आहे. भारताने 2030 पर्यंत 500 गिगावॅट क्षमतेचे लक्ष्य ठेवले असून ते आताच लक्ष्य 60 टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात साध्य झाले आहे. इतकेच नव्हे; तर देशाच्या एकूण वीज निर्मिती क्षमतेपैकी 552 गिगावॅटमध्ये जीवाश्मेतर इंधनातून निर्माण होणाऱ्या विजेचा वाटा 54 टक्क्यांपेक्षा अधिक झाला आहे.



आघाडी ही सौर ऊर्जेच्या विस्तारासाठी समर्पित असलेल्या सर्वात महत्त्वाच्या जागतिक भागीदारींपैकी एक आहे. संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय सौर आघाडीला निरीक्षकाचा दर्जा दिला आहे. यामुळे 'एक सूर्य, एक विश्व, एक ग्रिड' या संकल्पनेला प्रोत्साहन मिळत आहे.

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी विकेंद्रित नवीकरणीय ऊर्जा प्रणाली, सौर सिंचन आणि ग्लोबल सोलर फॅसिलिटी यांसारख्या अभिनव वित्त पुरवठा व्यासपीठांच्या माध्यमातून सदस्य देशांना सौर ऊर्जा उपाययोजना राबवण्यास मदत करत आहे. ऊर्जा परिवर्तन समावेशक, लोककेंद्रित आणि परिवर्तनकारी असू शकते, हे आयएसएच्या कार्यामुळे सिद्ध होत आहे. आयएसएने आपल्या सदस्य देशांच्या आणि भागीदारांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी अलीकडेच एक संकेतस्थळही सुरू केले आहे.

भारत सौर ऊर्जेच्या विकासाच्या एका नव्या युगात प्रवेश करत आहे. सौर ऊर्जेच्या बाजारपेठेत भारताची कामगिरी ही सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ, वाढते उत्पादन, मजबूत पायाभूत सुविधा आणि वाढता लोकसहभाग यांचे दर्शन घडवते. आंतरराष्ट्रीय स्तरावर आयएसएच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमांसोबतच भारत आपल्या पंचामृत वचनबद्धतेच्या आणि 2070 पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्याच्या दिशेने पुढे जात आहे. या प्रवासात सौर ऊर्जा हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनला आहे. भारताच्या जीवाश्मेतर ऊर्जा निर्मिती क्षमतेचे 2030 पर्यंत 500 गिगावॅटचे लक्ष्य साध्य करण्यातही सौर ऊर्जेचा वाटा मोठा असेल. ■

काशीचा नमो घाट

हवाई दलाचे शौर्यप्रदर्शन

आपला संसदीय मतदारसंघ असलेल्या वाराणसीच्या दौऱ्यावर असताना 25 ऑक्टोबर रोजी नमो घाट येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हवाई दल दिवसानिमित्त आयोजित हवाई प्रदर्शन-2026 पाहिले. त्याचबरोबर त्यांनी एका नवीन वस्त्रनिर्मिती सुविधेचे उद्घाटन केले. यामुळे मोठ्या संख्येने लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. वाराणसीमध्ये पंतप्रधान मोदी यांचा रोड शोदेखील आयोजित करण्यात आला; त्यामध्ये हजारो लोकांनी त्यांचे भव्य स्वागत केले.

महिलांसाठी रोजगाराच्या संधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातील वाराणसी इथे एका नवीन वस्त्रनिर्मिती केंद्राचे उद्घाटन केले. भारताच्या वस्त्रोद्योग आणि परिधान उत्पादन क्षेत्राला बळकटी आणि या क्षेत्रात औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे केंद्र एक महत्त्वाचे पाऊल आहे. आधुनिक उत्पादन पद्धतींवर लक्ष केंद्रित करत हे केंद्र विशेषतः महिलांसाठी रोजगाराच्या अर्थपूर्ण संधी निर्माण करेल. तसेच, प्रदेशाच्या आर्थिक प्रगतीत योगदान देईल. या उद्घाटनात औद्योगिक गुंतवणूक आणि उत्पादन क्षेत्राच्या नेतृत्वाखालील विकासासाठी एक महत्त्वाचे ठिकाण म्हणून उत्तर प्रदेशाची वाढती भूमिका अधोरेखित करण्यात आली. या केंद्रात तयार होणारी वस्त्रे जगभरातील बाजारपेठांमध्ये पोहोचतील. मुख्यतः महिलांच्या नेतृत्वाखालील हा उपक्रम असल्यामुळे तो महिलांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या विकासाचे एक ठोस प्रतीक आहे. वाराणसीच्या औद्योगिक विकासाला चालना देण्याबरोबरच हा उपक्रम महिलांना आत्मनिर्भर होण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी नव्या संधी उपलब्ध करून देईल.

राफेल-मिराजने घडवले शौर्याचे दर्शन

पंतप्रधान वाराणसीतील नमो घाट इथे हवाई दल दिवसानिमित्त आयोजित हवाई प्रदर्शन-2026 चे साक्षीदार बनले. भारतीय हवाई दलाच्या 94 व्या वर्धापनदिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाची संकल्पना 'विंग्स ओव्हर गँजीस' अर्थात 'गंगेवरून भरारी घेणारे पंख" अशी होती. या हवाई प्रदर्शनात तेजस, लाइट कॉम्बॅट हेलिकॉप्टर (एलसीएच) प्रचंड, एसयू-30एमकेआय आणि राफेल यांच्यासह परिवहन विमानांचाही समावेश होता. या कार्यक्रमात भारतीय हवाई दलाच्या प्रमुख प्रदर्शन पथकांमध्ये सूर्यकिरण एरोबॅटिक टीम आणि सारंग हेलिकॉप्टरचाही समावेश करण्यात आला होता. प्रदर्शनात अचूक



"काशीमध्ये रोड शोदरम्यान माझ्या कुटुंबियांकडून मिळालेल्या अपार प्रेमाने आणि आशीर्वादाने मी भारावून गेलो.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

उड्डाण, समन्वय आणि कार्य संचालनातील उत्कृष्टतेचे दर्शन घडवण्यात आले. यावेळी एसयू-30 लढाऊ विमानाने दोन जॅग्वार विमानांना मध्येच रोखून भारतीय हवाई दलाची युद्धनीती आणि हवाई संरक्षण क्षमतेची झलक दाखवली. त्याचवेळी, तीन राफेल लढाऊ विमानांनी 'नीलकंठ रचने'त एकत्र उड्डाण करत 'थ्री-वे स्प्लिट'चे शानदार प्रात्यक्षिक सादर केले. अचूकपणे या हवाई कसरती यशस्वी करताना भारतीय हवाई दलाचे कौशल्य आणि परस्परांमधील समन्वय दिसून आला. ■




PMO India
@PMOIndia

आमचे शेतकरी, आमचे अन्नदाता हे विकसित भारताच्या सर्वात भक्कम स्तंभांपैकी एक आहेत. आणि आमच्या सरकारने नेहमीच शेतकऱ्यांच्या कल्याणाला, शेतकऱ्यांना सशक्त करण्याला प्राधान्य दिले आहे – पंतप्रधान @narendramodi



Rajnath Singh @rajnathsingh ·

सरदार पटेल यांनी भारताची एकता आणि अखंडतेला आकार दिला. मात्र, दीर्घकाळ त्यांच्या गौरवशाली वारशाला तो सन्मान मिळाला नाही ज्यावर त्यांना खरोखर हक्क होता. पंतप्रधान @narendramodi यांनी स्टॅच्यू ऑफ युनिटी, राष्ट्रीय एकता दिवस आणि देशव्यापी आयोजनांच्या माध्यमातून त्याच्या गौरवशाली वारशाला योग्य सन्मान आणि नवी ओळख मिळवून दिली, कारण आम्ही असे मानतो की सरदार पटेल यांचा सन्मान हा भारताचा सन्मान आहे.



Amit Shah
@AmitShah

या वर्षी 31 मार्च रोजी देश नक्षल्यांपासून मुक्त झाला आणि पुढे 31 डिसेंबर 2029 पर्यंत पूर्णपणे नशामुक्तही होईल. 'विकसित भारता'चा पहिला टप्पा नशामुक्त भारत हाच आहे.



Nitin Gadkari

भारतासाठी अभिमानाचा क्षण!
आपल्या दिव्यांग क्रीडापटूंनी आशियाई पॅरा-खेळांमध्ये विक्रमी 114 पदके जिंकून ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आणि धैर्य, चिकाटी व क्रीडा प्रतिभेतून असामान्य शक्तीचे प्रदर्शन घडवले. तिरंगी झेंडा उंचावर फडकावणाऱ्या प्रत्येक क्रीडापटूचे हार्दीक अभिनंदन. माननीय पंतप्रधान @narendramodi यांच्या नेतृत्वाखाली क्रीडा प्रतिभेला खतपाणी घालण्याच्या भारताच्या वचनबद्धतेमुळे आपल्या क्रीडापटूंना जागतिक मंचावर उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या नव्या संधींचे क्षितिज खुले झाले आहे.



Kiren Rijiju @KirenRijiju ·

आज आम्ही संरक्षण, अंतराळ आणि आण्विक ऊर्जेचे संबंध दृढ करण्याबाबत सहमती दर्शवली आहे. या सर्व धोरणात्मक क्षेत्रांमध्ये आम्ही पोलंडच्या कंपन्यांना भारतासह संयुक्त विकास आणि संयुक्त उत्पादन करण्यासाठी आमंत्रित करत आहोत, माननीय पंतप्रधान @narendramodi #IndiaPolandFriendship



Arjun Ram Meghwal @arjunrammeghwal

देशातील 560 पेक्षा जास्त संस्थानांना एकत्र करून अखंड भारताचा पाया मजबूत करणाऱ्या सरदार पटेल यांचे अदम्य साहस, दूरदर्शित्व आणि राष्ट्रसेवा कायमस्वरुपी प्रेरणास्रोत राहतील.
भारताची एकता आणि अखंडत्वाचे प्रतीक लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवसा'च्या आपणा सर्वांना हार्दीक शुभेच्छा!
#SardarPatelJayanti #NationalUnityDay

प्रधानमंत्री ने विपक्ष पर साधा निशाना, कहा- जब देश किसी संकट का सामना करता है तो वह खुशी मनाता है

जीवन के अंतिम क्षण तक जनता की सेवा में ही जुटा रहूंगा : मोदी

संबोधन

भीलवाड़ी (गुजरात), एजेंसी। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने शुक्रवार को कहा कि वह अपनी अंतिम सांस तक देश की जनता की सेवा करते रहेंगे। उनका यह बयान कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे की कथित टिप्पणी के बाद आया है।

प्रधानमंत्री ने विपक्ष पर आरोप लगाया कि जब देश किसी संकट का सामना करता है तो वह खुशी मनाता है और पश्चिम पहिलवा में जारी संघर्ष के बीच उर्वरकों तथा रसोई गैस की उपलब्धता को लेकर लोगों में घबराहट फैलाता है। मोदी ने कहा कि किसान, युवा और महिलाएं विकसित भारत के निर्माण की दिशा में काम कर रहे हैं, लेकिन अफसोस है कि कुछ लोगों को देश की प्रगति रास नहीं आ रही है। दरअसल, पीएम मोदी गुजरात में बनासकांठा जिले के पेलानी में 'भारत बेरिंग्स इंडिया एंड रिसर्च सेंटर' का उद्घाटन करने और 14 हजार करोड़ रुपये की विकास परियोजनाओं का उद्घाटन एवं शिलान्यास करने के बाद एक जनसभा को संबोधित कर रहे थे।

पीएम-किसान की 21वीं किस्त जारी : इस दौरान पीएम ने प्रधानमंत्री किसान सम्मान निधि योजना की 21वीं किस्त भी जारी की। योजना के तहत पात्र किसानों को हर साल 6,000 की आर्थिक सहायता दी जाती है। इस किस्त के तहत 12 करोड़ किसानों के बैंक खातों में 18,000 करोड़ से अधिक की राशि अंतरित की गई।



रोड शो में गूंजा... 'मोदी कहीं नहीं जाएंगे'

कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे द्वारा पीएम मोदी पर की गई विवादित टिप्पणी के बाद से सियासी पारा चढ़ता ही जा रहा है। शुक्रवार को प्रधानमंत्री जब गुजरात के बनासकांठा में रोड शो के लिए निकले, तो सड़क किनारे खड़े लोग 'मोदी कहीं नहीं जाएंगे' लिखी तख्तियां लहराते और नारे लगाते दिखे। दूसरी तरफ यूपी में गुरुमंत्री अमित शाह ने भी 2029 में मोदी के फिर प्रधानमंत्री बनने की बात दोहराकर रिपीट पर पलटवार किया। साथ ही कि खरगे के बयान पर भाजपा ने साफ़ा लेकर चुनावी मंच तक आक्रामक जवाबी रणनीति अपना ली है।

किसानों पर अतिरिक्त बोझ न पड़े, यह ध्यान रखा

किसानों को संबोधित करते हुए मोदी ने कहा कि यूद्ध के कारण वैश्विक बाजार में उर्वरकों और उनकी निर्माण में इस्तेमाल होने वाले रसायनों की कीमतें में भारी वृद्धि हुई है, लेकिन सरकार ने यह सुनिश्चित किया है कि इसका अतिरिक्त बोझ किसानों पर न पड़े। उन्होंने कहा, दुनियाभर में यूरिया की एक बोरे की कीमत 3,000 रुपये तक है, जबकि भारतीय किसानों को यह 300 रुपये से भी कम में मिलता है। किसानों को यूरिया का एक बोरा महज 300 में उपलब्ध कराने के लिए सरकार ने अतिरिक्त बोझ खुद उठाया है।

सशक्त बनाने को प्राथमिकता दी


मोदी ने कहा बीते कुछ वर्षों में देशभर के किसानों को विभिन्न सरकारी योजनाओं के जरिए 50 लाख करोड़ से अधिक की राशि मिली है या उनकी इतनी बचत हुई है। पीएम ने कहा, सरकार ने किसानों के कल्याण और उन्हें सशक्त बनाने को प्राथमिकता दी है। पैरेंचर अनिश्चितता के बीच उर्वरकों की 6वीं कीमतों से किसानों को बचाने के लिए करीब 16 लाख करोड़ रुपये खर्च किए हैं।

हर मोदी ने कहा कि कुछ से पैदा हुई स्थिति से निपटने को पूरा देश एकजुट है, पर कुछ लोग अफवाहें फैलाकर जनता में घबराहट पैदा कर रहे हैं। मोदी ने आरोप लगाया, उन्होंने किसानों के बीच डर फैलाया कि उर्वरक उपलब्ध नहीं होंगे। उन्होंने कृत्रिम कमी बताई और घबराहट का माहौल पैदा किया।

केंद्र के कर्मचारियों को दिवाली गिफ्ट, DA बढ़ा

■ NBT रिपोर्ट, नई दिल्ली

पीएम नरेन्द्र मोदी की अध्यक्षता में मंत्रिमंडल ने केंद्र सरकार के कर्मचारियों के लिए महंगाई भत्ते (DA) और पेंशनभोगियों के लिए महंगाई राहत (DR) में 3% बढ़ोतरी की मंजूरी दी। यह बढ़ोतरी एक जुलाई से लागू होगी। इससे मूल वेतन/पेंशन के मौजूदा 60% की दर में 3% की बढ़ोतरी होगी ,ताकि बढ़ती कीमतों की भरपाई की जा सके। सूचना और प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव ने मंत्रिमंडल के फैसले की जानकारी देते हुए ये दिवाली का तोहफा बताया।



3% की बढ़ोतरी की गई महंगाई भत्ते में

- 10 हजार करोड़ का भार पड़ेगा सरकार के खजाने पर
- 48.54 लाख कर्मी और 68.71 लाख पेंशनभोगी है

कंटेनर मैन्युफैक्चरिंग का नया सेंटर

महंगाई भत्ते और महंगाई राहत में इस बढ़ोतरी से सरकारी खजाने पर सालाना 10,016.10 करोड़ रुपये का कुल भार पड़ेगा। इससे केंद्र सरकार के लगभग 48.54 लाख कर्मचारियों और 68.71 लाख पेंशनभोगियों को लाभ मिलेगा। बढ़ोतरी ?वे केंद्रीय वेतन आयोग की सिफारिशों पर आधारित है। मंगलवार को हुई कैबिनेट मीटिंग में DA बढ़ोतरी पर फैसला हुआ। इस बढ़ोतरी से महंगाई इससे पहले सरकार ने अप्रैल में कर्मचारियों के DA और पेंशनभोगियों के लिए DR में 2 फीसदी का इजाफा किया था।

मंत्रिमंडल ने वित्त वर्ष 2039-40 तक के लिए 'कंटेनर मैन्युफैक्चरिंग स्कीम' को मंजूरी दे दी है। 10,000 करोड़ की यह स्कीम भारत को वैश्विक कंटेनर निर्माण का नया केंद्र बनाने की दिशा में अहम पहल है। 13 साल की इस योजना के तहत पूंजी निवेश पर ब्याज सब्वेशन, टैरिफ एवं सर्टिफिकेशन, लैंड लीजिंग और परिचालन खर्च में सहायता दी जाएगी। इससे कंटेनर निर्माण में घरेलू क्षमता विकसित करने और आयात पर निर्भरता कम करने में मदद मिलेगी। कंटेनर निर्माताओं को ब्याज सब्सिडी सहायता के लिए 859 करोड़ रुपये का आवंटन किया गया है।

ग्राम स्वराज योजना को 7,395 करोड़

मंत्रिमंडल ने प्रधानमंत्री विकसित ग्राम स्वराज योजना के लिए 7,395 करोड़ रुपये की मंजूरी दी। वैष्णव ने इसे पहले से तय योजनाओं से हटकर स्थानीय स्तर पर क्षमता निर्माण पर केंद्रित मॉडल की ओर बड़ा बदलाव बताया। कहा, 'यह एक बड़ा बदलाव है।' इससे 2.55 लाख पंचायतों और पारंपरिक स्थानीय निकायों के लगभग 32 लाख प्रतिनिधियों के साथ पंचायतों को सीधा लाभ मिलेगा।

12 साल में 49.6 करोड़ लोग गरीबी से बाहर आए: PM

■ भाषा, नई दिल्ली/रायपुर: प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने विश्व बैंक की उस रिपोर्ट की सराहना की है, जिसमें कहा गया है कि भारत ने दुनिया में गरीबी में सबसे तेज गिरावट दर्ज करने वाले देशों में से एक के रूप में अपनी पहचान बनाई है। मोदी ने इंस्टाग्राम पर एक पोस्ट साझा की, जिसमें विश्व बैंक का हवाला देते हुए बताया कि 2011 से 2023 के बीच 49.6 करोड़ लोग गरीबी से बाहर आए। इस दौरान अत्यधिक गरीबी की दर में 90 प्रतिशत की गिरावट दर्ज की गई और यह हर चार में से एक से अधिक भारतीय के स्तर से घटकर लगभग 38 में से एक रह गई।


नरेन्द्र मोदी

उन्होंने कहा, 'महज छह वर्षों में रोजगार के अवसरों में 13.4 करोड़ की वृद्धि हुई। असमानता में काफी कमी आई है।' मोदी ने रविवार को छत्तीसगढ़ के 26वें स्थापना दिवस पर कहा कि कभी माओवाद से प्रभावित रहे राज्य के इलाके अब शांति और विकास के केंद्र बन रहे हैं।

एकता दिवस परेड में प्रधानमंत्री मोदी बोले

सरदार पटेल के फैसलों ने देश को एकजुट किया

प्रधानमंत्री मोदी ने एकतानगर को दी 400 करोड़ रुपए की सौगात

पर्यटन स्थल होंगे विशेष तो आकर्षित होंगे लोग, स्थानीय रोजगार को मिलेगा बढ़ावा

एएनआई नवी दिल्ली

प्रधानमंत्री ने गहेरु एकता दिवस के अवसर पर गुजरात के केवड़िया में एकता नगर के परेड ग्राउंड में आयोजित समारोह में हिस्सा लिया। इस दौरान राष्ट्रीय एकता दिवस परेड का आयोजन किया गया, जिसमें देश की एकता, विविधता और सामूहिक शक्ति की झलक देखने को मिली। परेड में भारत की समृद्ध सांस्कृतिक विरासत, अनुशासन और राष्ट्रीय गौरव को प्रदर्शित किया गया। पीएम मोदी ने कहा कि सरदार पटेल ने देश की एकता को आकार देने और उसकी रक्षा करने में अहम भूमिका निभाई। एकता हमें एक राष्ट्र के रूप

» आईआरसीटीसी होटल, रेलवेरिसेट व ट्रेनों टूरिस्ट ट्रेन समेत कई प्रोजेक्ट्स का उद्घाटन किया

» पर्यटकों को मिलेगी बेहतर सुविधा



लहरों का खास विकल्प मिलेगा

लोकल के लोकोपायलट होंगे ट्रेन के ऑटो चलने पर्यटकों को उनके पहुंचने के ठिकाने तक ले जाएंगे। उसके पहुंचने के ठिकाने तक ले जाएंगे। उसके पहुंचने के ठिकाने तक ले जाएंगे। उस

राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) दिवस - 22 नोव्हेंबर

युवा शक्तीला बळकट करणारी एनसीसी

एनसीसी ही एक अशी चळवळ आहे जी भारतातील तरुणांना आत्मविश्वासू, शिस्तप्रिय, संवेदनशील आणि देशाचे समर्पित नागरिक बनवते. देशातील एनसीसीचे जाळे अधिक मजबूत करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सीमावर्ती भागात राहणाऱ्या तरुणांना जास्तीत जास्त संख्येने एनसीसीशी जोडून घेण्याची मोहीम राबवली जात आहे. एनसीसी ही एक अशी संघटना आहे जी भारताच्या युवा शक्तीला आत्मविश्वासाने परिपूर्ण, सशक्त आणि सामाजिक बांधिलकी जपणारे नागरिक बनण्याची प्रेरणा देते.

> *एनसीसीमुळे आपल्याला शाळा-महाविद्यालयातील दिवस आठवतात. मी स्वतःही एनसीसीचा छात्र होतो. त्यातून मिळालेला अनुभव माझ्यासाठी अमूल्य आहे. एनसीसी युवा वर्गात शिस्त, नेतृत्व आणि सेवेची भावना निर्माण करते.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

एनसीसीमध्ये आहेत 20 लाखांहून अधिक छात्र

- वर्ष 1948 मध्ये 20,000 छात्रांच्या संख्येसह स्थापन झालेली एनसीसी ही आज जगातील सर्वात मोठी गणवेषधारी युवा संघटना आहे. या संघटनेत 20 लाखांहून अधिक सदस्य आहेत.
- वर्ष 2014 ते 2025 या कालावधीत या संघटनेतील सदस्यांची संख्या 6 लाखांनी वाढली आहे. सध्या देशातील 750 हून अधिक जिल्ह्यांमध्ये एनसीसीचे अस्तित्व आहे.



न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय DELHIN/2020/78812, 16–30 नोव्हेंबर 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 प्रकाशन दिनांक - 4 नोव्हेंबर 2026 पृष्ठसंख्या - 46

प्रधान संपादक
धीरेंद्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, वी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद,
महासंचालक, केंद्रीय संचार ब्युरो

खोली क्रमांक – 278, केंद्रीय संचार ब्युरो,
सूचना भवन, दुसरा माळा, नवी दिल्ली
110003 इथून प्रकाशित